रौप्य महोत्सवी
वर्ष २०१८

// स्त्रीशक्तिरतुल्या सदा //

वर्ष : १ अंक : ५

# साद

मे २०१८

# गृहिणी नसतात 'नॉन वर्कर'















महाराष्ट्र राज्य
महिला आयोग



रौप्य महोत्सवी
वर्ष २०१८

// स्त्रीशक्तिरतुल्या सदा //

# महाराष्ट्र राज्य महिला आयोग, मुंबई

अध्यक्षा



**विजया रहाटकर**

सदस्य



**नीता राजेंद्र ठाकरे**

सदस्य




**गयाताई शिवाजीराव कराड**

सदस्य



**देवयानी ठाकरे**

सदस्य



**विंदा कीर्तीकर**

सदस्य



**ॲड. आशा लांडगे**

पदसिद्ध सदस्य



**सतीश माथूर**
पोलीस महासंचालक

सदस्य सचिव



**डॉ. मंजूषा सुभाष मोळवणे**

रौप्य महोत्सवी
वर्ष २०१८
// स्त्रीशक्तिरतुल्या सदा //

# साद

**मुख्य संपादक**
विजया रहाटकर

**कार्यकारी संपादक**
डॉ. मंजूषा मोळवणे

**सहायक संपादक**
कपालिनी सिनकर

**प्रकाशक**
महाराष्ट्र राज्य महिला आयोग
पोटमाळा, गृहनिर्माण भवन
कलानगर, वांद्रे (पूर्व), मुंबई–५१
फोन : ०२२–२६५९०८७८

**मुद्रक**
आशुतोष प्रेस, ए२/२६४,
शाह आणि नहार औद्योगिक वसाहत,
एस. जे. मार्ग, लोअर परळ, मुंबई–१३

**वाचक संपर्क :**
saad.mscw@gmail.com

**आयोगाशी संपर्क :**
mscwmahilaayog@gmail.com
www.mscw.org.in
www.vijayarahatkar.co.in
Maharashtra Rajya Mahila Ayog (@mahascw)
@vijaya.rahatkar
@VijayaRahatkar
Tejaswini App

**'सुहिता' हेल्पलाइन**
**७४७७७२२४२४**

**स्वागत मूल्य : ₹ १०**
**वार्षिक स्वागत मूल्य : ₹ १००**



# संपादकीय



## उन्नाव, कठुआ आणि समाज

गेले दोन महिने सारा देश उन्नाव आणि कठुआ येथे घडलेल्या बलात्काराच्या घटनांनी हादरून गेला आहे. दोन्ही घटनांबाबत निषेधाचे सूरही मोठ्या प्रमाणात उमटले, ही स्वागतार्ह बाब आहे. बलात्कार हा केवळ निषेधार्ह नव्हे तर घृणास्पद गुन्हा आहे. बलात्कारी व्यक्तींना कठोरात कठोर शिक्षा व्हायलाच हवी. मात्र, समाज म्हणून आपलीही जबाबदारी आहे, की अशा घटनांचे राजकीयीकरण होऊ देऊ नये. या घटनांना जातीय, धार्मिक, पक्षीय रंग देऊ नयेत. कोणी स्त्री अथवा बालिका विशिष्ट जाती-धर्माची असते, म्हणून तिच्यावर बलात्कार होत नाही, ही बाब विसरता कामा नये.

समाज म्हणून विचार केला असता, अशा घटना आपल्यासाठी अशोभनीय आहेत. आपला वारसा उज्ज्वल आहे. सीता, द्रौपदी, गार्गी, संत मुक्ताबाई, झाशीची राणी अशा स्त्रिया याच समाजात होऊन गेल्या आहेत. तरीही आपल्याकडे बलात्कारांचे प्रमाण मोठे आहे. कठुआतील घटनेनंतर केंद्र सरकारने ज्या संवेदनशीलतेने आणि तत्परतेने बाललैंगिक अत्याचारप्रतिबंधक कायद्यात (पॉक्सो) बदल करून बारा वर्षांखालील मुलांवर अत्याचार करणाऱ्याला फाशीच्या शिक्षेची तरतूद केली, ते कौतुकास्पद आहे. त्याचबरोबर हा गुन्हा करणाऱ्याला किमान वीस वर्षांचा तुरुंगवास देणे बंधनकारक करण्यात आले आहे. सोळा वर्षांखालील मुलीवर सामूहिक बलात्कार करणाऱ्यांना आजीवन कारावासाची तरतूद वटहुकुमात करण्यात आली आहे. सोळा वर्षांखालील मुलींवरील बलात्कारासाठीची कारावासाची शिक्षाही सध्याच्या दहा वर्षांवरून वीस वर्षे करण्यात आली आहे. महिलांवरील बलात्कारासाठी कारावासाचा कालावधी सातवरून दहा वर्षे करण्यात आला आहे. सोळा वर्षांखालील मुलींवरील बलात्कारासाठी अटकपूर्व जामीन यापुढे मिळणार नाही. त्याचबरोबर बलात्काराच्या गुन्ह्यांचा तपास दोन महिन्यांत पूर्ण करून सुनावणीदेखील दोन महिन्यांत पूर्ण करणे बंधनकारक करण्यात आले आहे. खटला निकाली काढण्यासाठी सहा महिन्यांची अंतिम मुदत आहे. हे चित्र बदलण्यासाठी आपण सर्वांनी मनापासून प्रयत्न करणे आवश्यक आहे. महाराष्ट्र राज्य महिला आयोग हे प्रयत्न पूर्वीही करत होता, आताही करीत आहे आणि यापुढेही करेल, याची ग्वाही मी आपल्याला देते. महिलांमध्ये जागरूकता निर्माण करण्यासाठी आयोग प्रयत्नशील आहेच, पण समाजातील पुरुषांनीही अंतर्मुख होऊन स्वतःला प्रश्न विचारणे आवश्यक आहे. स्त्रियांचा सन्मान करण्याची सुरुवात प्रत्येक घरातून व्हायला हवी. गल्ल्यांच्या कोपऱ्यांवरचे, नाक्यांवरचे टोळभैरव हद्दपार व्हायला हवेत. ती जबाबदारी आई-वडिलांनी घ्यायला हवी. प्रत्येक गोष्ट कायद्यावर सोपवून चालणार नाही. इंग्रजीत महिलांना 'बेटर सेक्स' असे म्हटले जाते, या 'बेटर सेक्स'ला 'बेस्ट सेक्स' कसे बनवता येईल, याचा विचार होणे आवश्यक आहे.



**विजया रहाटकर**, मुख्य संपादक आणि महाराष्ट्र राज्य महिला आयोगाच्या अध्यक्षा




**वाचकांना निवेदन** 'साद' हे महिला आयोगाचे मुखपत्र असले तरी, येथे प्रसिद्ध झालेल्या प्रत्येक लेखांशी आयोग सहमतच असेल, असे नाही.

# अंतरंग...


## महिलांच्या सुरक्षेसाठी पोलिस दल कटिबद्ध



पोलिस दलाच्या वतीने महिला सुरक्षेसाठी राबविण्यात येत असलेल्या विविध उपाययोजनांची माहिती देणारी पोलिस महासंचालक सतीश माथूर यांची मुलाखत.

पान ७

## दाद द्या, शेतकरीपत्नींच्या प्रयत्नांना




शेतकरी पतीच्या आत्महत्येनंतर त्यांच्या मागे राहिलेल्या पत्नीची परवड होते. अशा विधवांपैकी अनेक जणींनी आता आपली कुटुंबे जगविण्याची धडपड चालवली आहे.

पान १४

## आयोगाच्या प्रयत्नांमुळे झाली पुनर्भेट

पत्रकार आशिष चांदोरकर यांनी लिहिलेल्या 'मॅन ऑन मिशन महाराष्ट्र' या पुस्तकातील यशोगाथा...




पान २१

## 'सखी-रुपे'री...

रुपेरी पडद्यावरची स्त्री प्रतिमा हा आपल्या सगळ्यांच्याच औत्सुक्याचा आणि आवडीचा विषय असतो. अशाच काही समकालीन स्त्री-प्रतिमांचा, कलाकृतींचा वेध घेणारा आणि त्यामागचा अन्वयार्थ शोधण्याचा प्रयत्न करणारा नवा स्तंभ...

पान २५

## देशोदेशीच्या (वुई)मेन

जगभरात महिलांनी आपल्या कर्तृत्वाचा ठसा उमटवला आहे. महिलांनी आपापल्या क्षेत्रात सर्वोच्च स्थान प्राप्त केले आहे. अशाच काही कर्तृत्ववान महिलांचा परिचय करून देणारे नवे सदर.

पान २७

# आम्ही आवाज उठवल्यानेच ‘पॉक्सो’त बदल



## राज्य महिला आयोगाच्या अध्यक्ष विजया रहाटकर यांची माहिती

**इंग्रजी वृत्तपत्र ‘मिड डे’मधील मुलाखतीचा संपादित अंश...**

कठुआ आणि उन्नाव येथे घडलेल्या बलात्काराच्या घटनांनी देशभर क्षोभ उसळला. या घटनांचा तीव्र निषेध करतानाच, केवळ कायदे करून भागणार नाही, समाजाची मानसिकताही बदलण्याची गरज आहे, असे मत राज्य महिला आयोगाच्या अध्यक्ष विजया रहाटकर यांनी व्यक्त केले.

**महाराष्ट्र राज्य महिला आयोगाच्या प्रमुख या नात्याने आपण अद्याप उन्नाव आणि कठुआ येथील बलात्काराच्या घटनांवर भाष्य का केले नाही?**

**उत्तर :** उन्नाव आणि कठुआसारख्या घटनांची अत्यंत कठोर शब्दांत निर्भत्सर्नाच केली गेली पाहिजे. समाजाने महिलांकडे पाहण्याचा दृष्टिकोन बदलायला हवा.

**मात्र, आपण राज्य महिला आयोगाच्या प्रमुख असूनही या घटनांवर प्रतिक्रिया व्यक्त केलेली नाही..**

**उत्तर :** मी या विषयांवर बोलले आहे. आम्ही एकत्रितपणे उठविलेल्या आवाजामुळेच सरकारला बाललैंगिक अत्याचार प्रतिबंधक कायद्यात (पॉक्सो) बदल करून लहान मुलांवरील अत्याचारासाठी फाशीच्या शिक्षेची तरतूद असणारा वटहुकूम काढावा लागला.

**बलात्काराच्या घटनांविरोधात देशभर निदर्शने होत आहेत. सरकारवर दबाव आणण्याचा हा प्रभावी मार्ग आपल्याला वाटतो का?**

**उत्तर :** आपल्या भावना व्यक्त करण्याचा अधिकार घटनेने प्रत्येकाला दिला आहे. मात्र, बलात्काराच्या घटनांचे राजकीय भांडवल केले जाऊ नये, असे माझे ठाम मत आहे. या साऱ्याची सुरुवात कोठून होते हे पाहिले पाहिजे. जन्माच्या वेळीच मुलगा आणि मुलगी असा भेद सुरू होतो. अद्यापही अनेक घरांत मुलगा जन्माला आला की आनंदोत्सव साजरा केला जातो आणि मुलगी जन्माला आली की निराश वातावरण असते. यावरून मनोभूमिका बदलण्याची गरज आहे, ही बाब अधोरेखित होते.

**निर्भया प्रकरणानंतरही अत्याचाराच्या घटना कमी झाल्याचे दिसत नाही. विनयभंग, हल्ले आणि बलात्काराच्या तक्रारींत वाढच होत आहे.**

**उत्तर :** तक्रारींत वाढ होण्याचे कारण म्हणजे महिला आता अधिक जागरूक झाल्या आहेत. आता बलात्काराच्या घटनांची तक्रार पोलिसांत करण्याचे प्रमाण वाढले आहे. आपल्यावर अन्याय झाल्यास मार्ग आहे, याची जाणीव त्यांना झाली आहे. आपल्याला सन्मान राखला गेला पाहिजे, हे त्यांना जाणवले आहे. निर्भया घटनेनंतर कायद्यातही बदल झाला आहे, पण फक्त कायद्यानेच साऱ्या गोष्टी होत नसतात. समाजातही बदल घडून येणे आवश्यक आहे.

❖❖❖

# 'सुहिता' तुमच्यासाठी आयोगाचा मदतीचा हात

संकटात आहात ? माहिती हवीय ?

**घाबरू नका... सहन करू नका...**

संपर्क साधा 'सुहिता'वर

**महाराष्ट्र राज्य महिला आयोगाची तुमच्यासाठी हेल्पलाइन**

Helpline **७४७७७२२४२४**



**आयोगाशी संपर्क :-**

- mscwmahilaayog@gmail.com
- www.mscw.org.in
- Maharashtra Rajya Mahila Ayog (@mahascw)
- Maharashtra women commission (@mscw_bandra)
- Tejaswini App



# महिलांच्या सुरक्षेसाठी पोलिस दल कटिबद्ध

**राज्याचे पोलिस महासंचालक महाराष्ट्र राज्य महिला आयोगाचे पदसिद्ध सदस्य असतात. पोलिस दलाच्या वतीने महिला सुरक्षेसाठी राबविण्यात येत असलेल्या विविध उपाययोजनांची माहिती पोलिस महासंचालक सतीश माथूर यांनी 'साद'ला दिली.**

**प्रश्न : आपण पदभार स्वीकारल्यानंतर महिलांच्या सुरक्षेसाठी कोणकोणते उपक्रम राबवले?**

दि. १-८-२०१६ रोजी मी पोलिस महासंचालकपदाचा कार्यभार स्वीकारला. त्यानंतर राज्यातील कायदा आणि सुव्यवस्था राखण्यासाठी ज्या प्राथमिक कर्तव्यांना प्राधान्य द्यायचे मी ठरविले होते, त्यात महिलांच्या सुरक्षा हे अग्रक्रमावर होते. महाराष्ट्र हे देशातील प्रगत व आघाडीचे राज्य असून, येथील महिलांचे सामाजिक, राजकीय, आर्थिक तसेच शैक्षणिक क्षेत्रातील योगदान अत्यंत उल्लेखनीय आहे. महाराष्ट्र राज्य पोलिस दल महिलांच्या सुरक्षेसाठी वेगवेगळे उपक्रम राबविण्यात नेहमीच आघाडीवर असते. महासंचालक पदाचा कार्यभार स्वीकारल्यापासून महिला सुरक्षेसंबंधी राबविले जाणारे उपक्रम अधिक प्रभावी कसे होतील, याकडे माझा कटाक्ष असतो. मी स्वतःदेखील काही सुधारणा घडविण्याचा प्रयत्न केला आहे. पोलिस ठाण्यात तक्रार नोंदविण्यासाठी तसेच पारपत्र पडताळणीसाठी वा अन्य कोणत्याही कामासाठी आलेल्या महिलेला जास्त वेळ बसवून न ठेवता त्यांच्या तक्रारीची दखल

सन्मानपूर्वक घेण्यास प्राधान्य देण्याचा आदेश मी दिला. त्याची काटेकोर अंमलबजावणी होते की नाही, याकडेही मी लक्ष पुवित असतो. कामकाज प्रभावी चालावे, या हेतूने महिला अत्याचारप्रतिबंधक विभाग नागरी हक्क संरक्षण विभागाकडे वर्ग करण्यात आला आहे. नागरी हक्क संरक्षण व महिला अत्याचार प्रतिबंधक कक्ष असे नवीन नाव त्याला देण्यात आले आहे. विशेष पोलिस महानिरीक्षक दर्जाचे अधिकारी त्यावर देखरेख करतात.



महिलांवरील अत्याचार विशेषतः बलात्कार, हुंडाबळी, अपहरण, अनैतिक व्यापार आणि घरगुती हिंसाचार इत्यादी गुन्ह्यांबाबत बृहन्मुंबई, ठाणे शहर, पुणे शहर, नागपूर शहर, पुणे ग्रामीण, यवतमाळ, अहमदनगर येथे विशेष तपास पथके स्थापन करण्यात आली आहेत. महिलांवरील अत्याचाराची प्रकरणे हाताळणे, गुन्हेगारांना विहीत कालावधीत शिक्षा होण्यासाठी पाठपुरावा करणे, गुन्हे प्रतिबंधात्मक उपाययोजना व जनजागृती, तसेच, या घटनांच्या तपासासाठी व आढाव्यासाठी प्रत्येक जिल्हा पातळीवर विशेष पथके स्थापन करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. माहिती-तंत्रज्ञान क्षेत्रात काम करणाऱ्या महिलांच्या सुरक्षेसाठी उपाययोजना सुचविण्यासाठी पुण्याच्या पोलिस आयुक्तांच्या अध्यक्षतेखाली आठ सदस्यांची समिती स्थापन केली होती. त्यात चार महिला आमदारांचा समावेश होता. या समितीच्या शिफारशींनुसार माहिती-तंत्रज्ञान क्षेत्रातील महिलांच्या सुरक्षेसाठी उपाययोजना राबविण्यात येत आहेत.

**प्रश्न : सध्या सायबर क्राइमचे प्रमाण वाढते आहे. त्याचबरोबर गुन्हेगारही नव्या तंत्रज्ञानाचा वापर करीत आहेत. त्यांना पायबंद घालण्यासाठी पोलिस कोणते उपाय करीत आहेत?**

सायबर क्राइमचे प्रमाण सध्या वाढले, हे खरे आहे. विविध सोशल मीडिया साइट, ऑनलाइन खरेदी, ई-मेल, बातम्या, मनोरंजन, संगीत, बँकिंग व्यवहार, ई वॉलेट आदी सुविधा स्मार्टफोनद्वारे आपल्या हातात असतात. मात्र, त्यांच्या सुरक्षिततेबाबत माहितीचा अभाव आहे. विशेषतः महिला ऑनलाइन फसवणुकीला बळी पडण्याचे प्रमाण मोठे आहे.

वाढत्या सायबर गुन्ह्यांना आळा घाळण्यासाठी ही गुन्हेगारी समर्थपणे हाताळू शकणारे पोलिस अधिकारी आणि अंमलदार घडविणे तसेच, त्यासाठी आधुनिक तंत्रज्ञान व साधनांचा वापर करणे हे आपल्यासमोरील सध्याचे मोठे आव्हान आहे. त्या दृष्टीने महाराष्ट्र पोलिस दलाने पावले उचलली आहेत. मुंबईत सायबर पोलिस ठाण्याची स्थापना, सायबर लेबची निर्मिती हे पहिले पाऊल होते. आता प्रत्येक जिल्ह्यात सायबर लेब स्थापन करण्यात आल्या आहेत. १५ ऑगस्ट २०१६ रोजी राज्यभरात ४४ ठिकाणी एकाच वेळी सायबर लेब उभारण्यात आल्या. ऑनलाइन लॉटरी वा परदेशी नोकऱ्यांच्या आमिषाला बळी न पडणे, फोन बँकिंगच्या नावाखाली होणारी फसवणूक, सोशल साइटवर आक्षेपार्ह मजकूर वा साहित्य शेअर वा फॉरवर्ड करणे टाळावे, आपले मोबाइल व इलेक्ट्रॉनिक साधने सुरक्षित ठेवणे याबाबत महिलांमध्ये जागरूकता निर्माण करण्याचे प्रयत्न सुरू आहेत.

**प्रश्न : महिलांविरोधातील गुन्ह्यांची संख्या वाढते आहे. ती कमी कशी करता येईल?**

महिलांविरोधातील गुन्ह्यांची संख्या वाढते आहे, ही गोष्ट खरी नाही. सध्या महिलांमध्ये जागरूकता निर्माण झाल्यामुळे गुन्हे दाखल करण्याचे प्रमाण वाढले आहे. हुंडाबळी, छेडछाड व विनयभंगाच्या गुन्ह्यांमध्ये घटच झाल्याचे आकडेवारीवरून दिसते. ही बाब दिलासादायक आहे. स्त्री भ्रूणहत्येच्या गुन्ह्यांतील वाढ मात्र चिंताजनक आहे. या गुन्ह्यांना आळा घालण्यासाठी पोलिस प्रतिबंधात्मक उपाययोजना करतातच, पण नागरिकांची मानसिकता बदलणेदेखील आवश्यक आहे.

महिलांविरोधातील गुन्ह्यांना आळा घालण्यासाठी, तसेच गुन्ह्यांचा तपास जलद होण्यासाठी पोलिसांना वेळोवेळी आदेश दिले जातात. राज्य गुन्हे अन्वेषण विभागातर्फे महिलांविरोधातील गुन्ह्यांसाठी कार्यपद्धती तयार करण्यात आली आहे. महिलांच्या तक्रार अर्जांची चौकशी करण्यासाठी, व या अर्जांवर संवेदनशीलपणे आणि तत्काळ कार्यवाहीसाठी प्रत्येक पोलिस ठाण्यात स्वतंत्र महिला

सहाय्य कक्षांची स्थापना करण्यात आली आहे. जिल्हा पातळीवर पोलिस आयुक्त किंवा पोलिस उपायुक्त, पोलिस अधीक्षक यांच्या अध्यक्षतेखाली महिला सुरक्षा समित्या स्थापन करण्यात आल्या आहेत. त्यात महिला डॉक्टर, वकील, प्राध्यापिका, सामाजिक कार्यकर्त्या यांचा समावेश करण्यात आला आहे. पोलिस ठाण्यांच्या स्तरावरही अशा समित्या स्थापन करण्यात आल्या आहेत.

**प्रश्न : आपण राज्य महिला आयोगाचे पदसिद्ध सदस्य आहात. आयोगातील आपल्या सक्रिय भूमिकेविषयी सांगा.**

राज्य महिला आयोगाचा पदसिद्ध सदस्य या नात्याने, तसेच राज्याचा पोलिस महासंचालक या नात्यानेही राज्यातील महिलांच्या सुरक्षेसाठी मी स्वतःला बांधील मानतो. मी संपूर्ण सेवाकाळात या बाबीला प्राधान्य दिले आहे. इतरही प्रत्येक पोलिस अधिकाऱ्याने ते प्राधान्य दिलेच पाहिजे, असे मला वाटते. कारण, एखाद्या देशातील, राज्यातील महिला सुरक्षित असणे हे त्या देशाची कायदा आणि सुव्यवस्था उत्तम स्थितीत असल्याचे द्योतक असते, असे माझे प्रामाणिक मत आहे. ज्या समाजात महिला सरक्षित असतील त्याच समाजाची सर्वांगीण प्रगती आणि विकास होणे शक्य आहे. महिलांची सुरक्षा व त्यांच्यावर होणाऱ्या अन्यायाविरोधात न्याय मिळवून देण्यासाठी राज्य महिला आयोगास माझे व माझ्या संपूर्ण पोलिस दलाचे नेहमीच सहकार्य असेल, अशी ग्वाही मी देऊ इच्छितो.

**प्रश्न : महिलांविरोधातील गुन्हे रोखण्यासाठी नव्यातंत्रज्ञानाचा वापर कसा केला जाते आहे? त्याला कसा प्रतिसाद मिळत आहे?**

बदलत्या काळानुरूप महिलांविरोधातील गुन्हे रोखण्यासाठी, त्या संकटात असताना त्यांना तत्काळ पोलिस मदत उपलब्ध करून देण्यासाठी नवीन तंत्रज्ञानाचा वापर संपूर्ण राज्यात केला जात आहे. काही पोलिस घटकांमध्ये फक्त महिला व लहान मुलांच्या मदतीसाठी वेगळी बिनतारी वाहने कार्यरत आहेत. फक्त एका क्लिकद्वारे तुम्ही संकटात असल्याची माहिती पोलिसांपर्यंत पोहोचविणारी प्रतिसाद, बडी कॉप, निर्भया पथक (फेसबुक अकाउंट), एफआयआर ॲप, ठाण्यात रिक्षाने प्रवास करणाऱ्या महिलांसाठी सेफ जर्नी ॲप (रिक्षा स्मार्ट कार्ड आधारित) अशी अनेक अप्स उपलब्ध करून देण्यात आली आहेत. या सर्व हेल्पलाइन व मोबाइल अपना महिलांकडून चांगला प्रतिसाद मिळत आहे. त्याद्वारे गुन्ह्यांना प्रतिबंध करण्यात पोलिस दलाला बऱ्यापैकी यश मिळत आहे.

**प्रश्न : राज्याचे पोलिस प्रमुख म्हणून आपण महिलांना काय संदेश द्याल?**

स्त्री ही साक्षात शक्तीचे रूप आहे, असे मानले जाते. आज जवळजवळ सर्वच क्षेत्रांत स्त्रिया पुरुषांच्या बरोबरीने कधी कधी तर पुरुषांच्या एक पाऊल पुढे राहूनही काम करीत आहेत. पिढ्यानपिढ्या पुरुषांची मक्तेदारी समजल्या जाणाऱ्या क्षेत्रातही स्त्रिया आपल्या कर्तृत्वाचा ठसा उमटवत आहेत सकाळी १० ते सायंकाळी ६ अशा सुरक्षित नोकरीच्या पलीकडे जाऊन आयटी, इव्हेंट मॅनेजमेंट, रेडिओ जॉकी, मार्केटिंग अशा विविध क्षेत्रांत जिथे कामाला वेळेच्या बंधनात अडकवता येत नाही, अशा ठिकाणी महिला झोकून देऊन काम करीत आहेत. त्यात यशस्वी होत आहेत. त्यामुळेच बदलत्या काळानुसार स्त्रियांनी शिक्षण, उच्च शिक्षण यासोबतच स्वसंरक्षणाचे देखील प्रशिक्षण अर्जित करणे आवश्यक आहे. स्त्रियांचे हक्क व अधिकार अबाधित राहावेत, यासाठी पोलिस दलाचे त्यांना नेहमीच सहकार्य असेल. स्वतःचे हक्क व अधिकारांच्या बाबतीत स्त्रिया जागरूक, तसेच शारीरिक व मानसिकदृष्ट्या सक्षम असतील, तर त्यांना त्यांचे ध्येय साध्य करण्यापासून रोखणे केवळ अशक्य आहे.

## महिला सुरक्षेसाठी प्रतिसाद ॲप

http://play.google.com/store/apps/details?id=com.snt.uniqueguardhl=en

**कार्यप्रणाली :** संकटकाळी या ॲपमधील इमर्जन्सी बटन दाबताच नियंत्रण कक्षात तसेच, तीन किलोमीटर अंतरात ड्युटीवर असलेल्या पोलिस अधिकारी, अंमलदार यांना त्यांच्या मोबाइलवर अलर्ट दिला जातो. मदत मागणाऱ्या व्यक्तीची पूर्ण माहिती, ठिकाण व तेथे पोहोचण्याचा मार्ग ॲपद्वारे दाखविला जातो व एसएमएसदेखील पाठवला जातो. त्यावेळी मदत मागणाऱ्या व्यक्तीच्या मोबाइलवर त्याची तक्रार, आयडी क्र. त्याच्या जवळच्या भागात ड्युटीवर असलेल्या पोलिस अधिकारी, अंमलदार याचा मोबाइल क्रमांक दिला जातो. मदत कोठपर्यंत पोहोचली आहे, याची माहितीदेखील पुरवली जाते. गुगल प्ले स्टोअर व ॲप स्टोअरमधून हे ॲप डाउनलोड करून घेता येते.

**पोलिस इमर्जन्सी हेल्पलाइन नं. १००, फक्त महिलांच्या तक्रारींसाठी हेल्पलाइन क्र. १०३, मुंबई रेल्वेची निर्भया हेल्पलाइन -९८३३३१२२२२ व २४ तास हेल्पलाइन ९८३३३३११११ आदी कार्यरत आहेत.**

**स्त्री भ्रूणहत्येची तक्रार दाखल करण्यासाठी किंवा त्याबाबत अधिक माहिती देण्यासाठी राज्यामध्ये टोल फ्री क्र. १८००२३३४४७५ अस्तित्वात आहे. www.amchimulgi.gov.in ही वेबसाइटदेखील उपलब्ध आहे. तसेच तक्रारदारास २५,००० रुपये बक्षीस म्हणून देण्याचीही तजवीज करण्यात आली आहे.**



# गृहिणी नसतात 'नॉन वर्कर'



**२०२१ची जनगणना येऊ घातली आहे. त्यामध्ये गृहिणी हा विभाग 'स्पेशल' करण्यात यावा किंवा 'नॉन वर्कर' म्हणून तरी त्यांची नोंद करू नये, यासाठी नाशिकमधील सुलभा शेरताते प्रयत्नशील आहेत. काय आहे त्यांची भूमिका?**

## प्राची एक्के

गृहिणी म्हणजे 'एक गृह जिचा सर्वस्वी ऋणी आहे ती गृहिणी! घराचा खरा आधारस्तंभ, 'स्व'ला बाजूला ठेऊन केवळ आणि केवळ घरासाठी आपले संपूर्ण आयुष्य खर्ची घालणारी, 'ह्युमन कॅपिटल' तयार करण्यात सर्वांत मोठं योगदान देणारी आणि असं असूनही आपल्या जनगणनेत तिचं स्थान 'नॉन वर्कर' या विभागात! ज्यात भिकारी, वेश्या असे घटक येतात त्यात. कोणत्या आधारावर गृहिणीला 'नॉन वर्कर' म्हणून गणलं जातं याचा विचार आपण सुज्ञांनीच करायला हवा.

आपल्या समाजात अजूनही स्त्रियांना मानाचे आणि स्वाभिमानाचे जीवन मिळत नाही आणि ज्या गृहिणी म्हणून आपल्या जबाबदाऱ्या पार पाडत असतात त्यांच्या कामाला तर आर्थिक आणि सामाजिक दृष्ट्याही कोणतेच परिमाण नसल्याने त्यांना कायमच दुय्यम वागणूक दिली जाते. समाजात गृहिणीचा अर्थ लग्न करून जोडीदाराबरोबर घरी आलेली एक व्यक्ती, जिच्याकडे पैसे कमविण्याचा कोणताही स्रोत नाही, स्वतःसाठी पैसा कमविण्याच्या कोणत्याही कृतीमध्ये जी सामील होऊ शकत नाही. तिच्याकडे कोणतेही जबाबदारीचे काम नाही, असे समजले जाते. वास्तविक, स्त्रिया तीन भूमिका पार पाडत असतात. पुनरुत्पादक, उत्पादक आणि व्यवस्थापक, परंतु २०११ पर्यंत भारताच्या जनगणनेत महिला



केवळ दुसरी भूमिका बजावत आहेत ते म्हणजे, उत्पादक वर्ग! आणि हा मुद्दा प्रकर्षाने जाणवला तो एमफील करून, पिएचडी एन्ट्रन्स दिलेल्या आणि सामाजिक संस्थेत काम करणाऱ्या सुलभा शेरताते यांना! त्यांनी गृहिणींसंदर्भात जो अभ्यास केला त्यानुसार त्यांच्या ही बाब लक्षात आली. २०१३ मध्ये त्यावेळच्या महिला आणि बालकल्याण मंत्री कृष्णा तिरथ यांनी गृहिणींसाठी एक महत्त्वाची घोषणा केली होती, 'पूर्णवेळ गृहिणी असणाऱ्या महिलांना नवऱ्याच्या उत्पन्नातला २० टक्के वाटा थेट मिळावा अशी ती घोषणा होती. त्यानंतर याबद्दल बरीच चर्चा झाली. त्यावेळी गृहिणींचं म्हणणं होतं की 'आम्हाला पगार नको सन्मान हवाय' त्या अनुषंगाने सुलभा शेरताते यांना गृहिणींचं नेमकं म्हणणं जाणून घ्यायचं होतं की, या गृहिणी पैसे का नाकारत आहेत. कारण ही एक संधी आहे त्यांना थोडं स्वावलंबी होण्याची असं त्यांना वाटत होतं.

त्यावेळी केलेल्या अभ्यासानुसार आणि गृहिणींशी बोलताना समोर आलेले रिझल्ट खूपच थक्क करणारे होते. खूपच आश्चर्यकारक होते. आपल्याला ५० एक वर्ष मागे नेणारे होते. त्यातला महत्वाचा मुद्दा असा की, आपल्याकडे कुठेच 'गृहिणी' हा विभागच नाही. जनगणनेचा अभ्यास करताना असं लक्षात आलं की, गृहिणींना 'नॉन वर्कर' या विभागात स्थान देण्यात आले आहे. म्हणजे 'अर्निंग वर्कर' आणि 'नॉन अर्निंग वर्कर' असे विभाग असतात त्यातील 'नॉन अर्निंग विभागा'त विद्यार्थी, भिकारी, वेश्या असे घटक येतात तसेच अवलंबून असणारे घटक येतात. त्यांच्या बरोबर गृहिणींना बसवलेलं आहे पण खरं पाहता असं नाही. गृहिणी या केवळ गृहिणी नाहीत तर देशाच्या भांडवलात भर टाकणारा एक घटक आहेत. 'ह्युमन कॅपिटल' तयार करण्यात सर्वात मोठं योगदान गृहिणींचं आहे. आता 'ह्युमन कॅपिटल' म्हणजे काय तर, भविष्यातील कामगार वर्ग तयार करणे. कारण एका मुलाला जन्म देऊन गृहिणी तिथेच थांबत नाही तर तो मुलगा देशाच्या कुठल्याही क्षेत्रात काम करण्यास लायक होईल अशी क्षमता गृहिणी त्यात निर्माण करत असतात. तरी सुद्धा या कामाची कुठेही दखल घेतली जात नाही. त्याचा उल्लेखही कुठे केला जात नाही. गृहिणींच्या श्रमाचं मूल्यांकन करून त्याची दखल घेतली गेलीच पाहिजे.

आता २०२१ची जनगणना येत आहे तर किमान तेव्हा तरी गृहिणी हा विभाग 'स्पेशल' करण्यात यावा किंवा 'नॉन वर्कर' म्हणून तरी त्यांना काढून टाकण्यात यावं असा महत्वाचा मुद्दा सुलभा शेरताते यांनी मांडला आहे. या मुद्द्याकडे आता खरंच गांभीर्याने लक्ष देण्याची गरज आहे.

गृहिणी हा जरी एक साधा शब्द वाटत असला तरी त्याचा अर्थ खुप महत्वाचा आहे. गृहिणी म्हणजे 'एक गृह जिचा सर्वस्वी ऋणी आहे ती गृहिणी!' जीवनाच्या विविध टप्प्यांवर वेगवेगळे मुखवटे परिधान करून अनेक भूमिका समर्थपणे पेलण्याची जबाबदारी 'तिला' निभावावी लागते. मुलाला जन्म देणाऱ्या आईपासून खुप सारी कामं तिला एकाचवेळी करावी लागतात. अशी हि गृहिणी अनेक आव्हानांना सामोरी जात असते. स्त्रीच्या सर्व भूमिकांमधील सर्वाधिक कठीण आणि महत्वाची भूमिका नक्कीच गृहिणीची आहे. गृहिणी होण्याचा अर्थ, ठराविक वेळेत सर्व कामे डोकं शांत ठेवून योग्यरीत्या पूर्ण करणे. मुलांना सांभाळतानाच घरातील रोजची अनेक कामे आपले शरीर आणि मन काबूत ठेऊन ती करत असते. गृहिणी म्हणजे एक विवाहित महिला जिचा पायाच आपल्या कुटुंबाची काळजी घेणे, घरातील समस्या सोडवणे आणि घरातील रोजची सर्व कामे यशस्वीपणे मार्गी लावणे. गृहिणी होणं हे खरंच सोपं काम नाही. कारण तिला एकाच वेळेस घरातील हालचालींवर नियंत्रण ठेवायचे असते आणि त्याचबरोबर स्वतःलाही वेळ द्यायचा असतो.

खरं पहिलं तर गृहिणी हीच घराचा खरा आधारस्तंभ आहे, पण याची जाणीव समाजाला आहे का? किती घरांमध्ये गृहिणीला मानाची, सन्मानाची वागणूक मिळते. आपल्या समाजात आजही गृहिणीला खुपच सामान्य समजलं जातं. आणि सर्वांत मोठी शोकांतिका म्हणजे, नोकरदार महिलाच गृहिणींना कमी दर्जाच्या समजतात. गृहिणी म्हणजे कमी शिकलेली, बिन कामाची अशी धारणा आजही आपल्या समाजात आहे. परंतु खरी परिस्थिती तशी नाही. आज अनेक उच्चशिक्षित महिला काही कारणामुळे नोकरी करू शकत नाहीत. एनडीटीव्हीने नुकत्याच दिलेल्या वृत्तानुसार, आपल्या देशात पन्नास टक्के महिला वयाच्या अवघ्या ३०व्या वर्षी मुलांच्या संगोपनासाठी नोकरी सोडतात आणि गृहिणी होतात. 'अशोका युनिव्हर्सिटीच्या जेनपॅक्ट सेंटर फॉर वूमन्स लीडरशिप'ने (**GCWL**) 'प्रिडिकमेंट ऑफ रिटर्निंग मदर्स' नावाने हा अहवाल जारी केला आहे. या अहवालानुसार आई झाल्यानंतर केवळ २७ टक्के महिला आपलं करियर पुढे सुरु ठेवतात. म्हणजेच बाळाला



जन्म दिल्यानंतर तब्बल ७३ टक्के महिला नोकरी सोडतात. कार्पोरेट, मीडिया आणि विकास क्षेत्रात काम करणाऱ्या शहरी क्षेत्रातल्या महिलांचा या अहवालात समावेश करण्यात आला होता. याशिवाय, घरातल्या वृद्धांची काळजी घेणे, कुटुंबीयांचा पाठिंबा नसणे आणि ऑफिसमधील वातावरण योग्य नसणे या कारणांमुळेही महिलांना नोकरी सोडून गृहिणीपद स्वीकारावं लागतं.

अनेक वेळेला गृहिणींच्या कामांना लहान मुलांचा खेळ समजले जाते, परंतू रोजच्या जीवनात ती अनेक आव्हानांना सामोरी जात असते. अनेक महिला घरातील अनेक तणावांचा सामना करत असतात. अशावेळेला तिला तणावातून मुक्त होण्यासाठी काही उपचारांचाही आधार घ्यावा लागतो. गृहिणींच्या कामांना कमी लेखण्याचे काहीच कारण नाही. त्यांचे कामही तितकेच मेहनतीचे असते आणि त्यातही योग्य वेळ आणि योग्य क्रम यांची आखणी करावीच लागते. गृहिणींनीही आपले काम पार पडताना आनंदी राहणे आवश्यक आहे. मुलांचा सांभाळ करताना येणारी आव्हानं त्यांनी आवडीनं पेलली पाहिजेत. मुलं आणि वडील यांच्यातील मध्य सांभाळण्याचे काम गृहिणीच यशस्वीरित्या करीत असते यात शंकाच नाही.

एका गृहिणीमध्ये किती गुण असतात याची आपण कल्पनाही करू शकत नाही. नुकताच महिलांच्या 'मल्टी टास्क'बद्दल वाचनात आलेला महत्वाचा भाग इथे आवर्जून सांगते. मग तुम्हीच ठरावा त्याचं मूल्यांकन! ती सर्वांसाठी स्वयंपाक करते म्हणजे ती चांगली शेफ आहे. ती मुलांचा अभ्यास घेते म्हणजे ती शिक्षिका आहे, ती सासू सासऱ्यांची, मुलांची, नवऱ्याची काळजी घेते म्हणजे ती केअरटेकरही आहे. ती घराची आणि मुलांची राखण करते म्हणजे ती सिक्युरिटी गार्डही आहे. ती काटकसर करून कमी दरात घरातील वस्तू आणते म्हणजे ती चांगली परचेस मॅनेजरही आहे. ती पाहुणे, मित्रमंडळी यांचा पाहुणचार करते म्हणजे ती चांगली रिसेप्शनिस्ट आहे. लग्नकार्यात घराची प्रतिनिधी म्हणून नटून जाते म्हणजे ती चांगली मॉडेलही आहे. आपला नवरा, सासू सासरे, मुलं यांचे ती बाहेर कौतुक करते म्हणजे ती खुप चांगली सेल्समन आहे. नवरा ताणतणावात असेल तर त्याचे सांत्वन करते, त्याला समजून घेते म्हणजे ती एक चांगली सायकॉलॉजिस्टही आहे. गृहिणी म्हणून संपूर्ण घराची स्वच्छता व नीटनेटकेपणाही ठेवते त्यामुळे ती चांगली हाऊसकीपर आहे. नवरा, घर अडचणीत असेल तर दागदागिने गहाण टाकून पैसे उभे करते म्हणजे ती ट्रबलशूटरही आहे. समाजात कुटुंबाबद्दल बोलत असते, तिच्यामुळे समाजात घराची ओळख असते म्हणजेच ती चांगली पब्लिक रिलेशन ऑफिसर आहे. ती संसाराचा हिशोब तंतोतंत ठेवते याचाच अर्थ ती चांगली फायनान्स कर्मचारी आहे. शेजाऱ्यांच्या, पाहुण्यांच्या बऱ्या वाईट प्रसंगात त्यांच्या मदतीला जाते, म्हणजे ती कार्पोरेट सोशल रिस्पॉन्सिबिलिटीही सांभाळते. आता ठरवा की, असे कोणते काम आहे जे एक गृहिणी पार पाडत नाही. एक उद्योजक किंवा कार्पोरेट कंपनी चालवण्यासाठी जे गुण लागतात ते सर्व तिच्याकडे आहे आणि याचा उपयोग ती आपले घर चालवण्यासाठी करत असते. आणि तरीही समाजाचा असा दृष्टिकोन असतो की, गृहिणी काहीच करत नाही.

हे सगळं जाणून घेतल्यावर गृहिणीला कोणत्या आधारावर ' नॉन वर्कर' म्हणून गणलं जातं याचा विचार आपण सुज्ञांनीच करायला हवा. 'स्व'ला बाजूला ठेऊन ती केवळ आणि केवळ घरासाठी आपला संपूर्ण आयुष्य खर्ची घालते आणि घराला घरपण देते. आपल्या समाजाने आता याची जाणीव ठेऊन गृहिणीचा खरा अर्थ समजून घेऊन तिच्या त्यागाचा सन्मान करायलाच हवा.




# नोकरदारांप्रमाणेच गृहिणीही असतात व्यग्र

## कर्नाटक उच्च न्यायालयाच्या निकालामुळे सन्मानावर शिक्कामोर्तब

पत्नी घरीच असते, घरकाम करून तिला बराच वेळ मोकळा असतो, असे मानणाऱ्यांना कर्नाटक उच्च न्यायालयाने जोरदार चपराक लगावली आहे. 'गृहिणीदेखील एखाद्या नोकरदाराइतकीच व्यग्र असते,' असे सांगत तिला प्रवास खर्चासाठी पुरेसे पैसे देण्याचा कौटुंबिक न्यायालयाचा आदेश उच्च न्यायालयाने कायम ठेवला.

गौरव राज जैन नावाच्या व्यक्तीने ही याचिका दाखल केली होती. गौरव आणि त्याच्या पत्नीने घटस्फोटासाठी बेंगळुरू येथील कौटुंबिक न्यायालयात अर्ज केला आहे. 'त्याच्या सुनावणीसाठी पत्नीला हवी प्रवासाची गरज नाही. ती गृहिणी असल्यामुळे तिच्याकडे पुष्कळ वेळ रिकामाच असतो. त्यामुळे ती सुनावणीसाठी रेल्वेने येऊ शकते,' असे गौरवचे म्हणणे होते.

मात्र, उच्च न्यायालयाने त्याचे म्हणणे फेटाळून लावले. 'तुमचा युक्तिवाद चुकीचा आणि लिंगसमानतेला छेद देणारा आहे.. सुनावणीसाठी पत्नीने कोणत्या साधनाने प्रवास करावा, हे ठरविण्याचा अधिकार पतीला नाही. पत्नीने सुनावणीसाठी विमानाने प्रवास करायचे ठरविल्यास तिला प्रवासखर्च देणे पतीवर बंधनकारक आहे,' असे न्या. राघवेंद्र चौहान यांनी म्हटले आहे.

गौरवची पत्नी श्वेता उत्तर प्रदेशातील मुझफ्फरनगर येथे राहते. घटस्फोटाच्या खटल्याच्या सुनावणीसाठी तिला मुझफ्फरनगरहून बेंगळुरूला विमानाने येण्याजाण्याचा खर्च म्हणून ३२,११४ रुपये देण्यात यावेत, असा आदेश कौटुंबिक न्यायालयाने १ फेब्रुवारी २०१८ रोजी दिला होता. त्याला गौरवने उच्च न्यायालयात आव्हान दिले होते. 'गृहिणीदेखील एखाद्या नोकरदाराइतकीच व्यग्र असते. तिला कुटुंबातील सदस्यांकडे लक्ष द्यावे लागते. घर चालवावे लागते (आणि ते ) सोपे नाही,' असे न्या. चौहान यांनी निकालपत्रात म्हटले आहे.

# दाद द्या, शेतकरीपत्नींच्या प्रयत्नांना



सुवर्णा दामले
prakriti_ngp@bsnl.in

**शेतकरी पतीच्या आत्महत्येनंतर त्यांच्या मागे राहिलेल्या पत्नीची परवड होते. अशा विधवांपैकी अनेक जणींनी आता आपली कुटुंबे जगविण्याची धडपड चालवली आहे. त्यात काहींना यशही येत आहे. त्यांचे हे प्रयत्न समाजापर्यंत पोहोचणे गरजेचे आहे.**

भारतातील सर्वच ग्रामीण भागात शेती हेच उपजीविकेचे प्रमुख साधन आहे. गेल्या काही वर्षांत शेतीत लागणारा खर्च भरमसाठ वाढला, मात्र त्या तुलनेत उत्पादनांत मात्र वाढ झाली नाही. तसेच शेतीपूरक व पर्यायी उत्पन्नाच्या साधनांमध्ये ही वाढ झालेली नाही. अशा ताणलेल्या आर्थिक परिस्थितीतून बाहेर पडतांना शेतकऱ्यांनी स्वतःलाच संपविले, मात्र त्यांच्या जाण्यामुळे पूर्ण घरदार-कुटुंब कोसळले.

अमरावती महसूल विभागात २००१ पासून १४,९८९ शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्याची नोंद आहे. तसेच जून २०१७ मध्ये शासनाने जाहीर केलेल्या कर्जमाफीनंतर आतापर्यंत ९५२ आत्महत्या झाल्या आहेत. शेतकऱ्यांच्या होत असलेल्या आत्महत्यांचे सत्रकाही केल्या थांबत नाही. या वस्तुस्थितीमुळे शेतकरी कुटुंब किती तणावात जगत असतील व कुटुंबप्रमुखाच्या आत्महत्येनंतर कोलमडलेली आर्थिक व मानसिक स्थिती सांभाळणे त्यांना शक्य होत असेल का? हा विचार केला तरी अंगावर काटा येतो.

वरील आकडेवारी निदर्शनासआणते की, सध्या करण्यात येत असलेले प्रयत्न पुरेसे नाहीत. शेतीवरच्या या संकाटाची पाळेमुळे खूप खोलवर गेली आहेत,



म्हणूनच तात्पुरती मदत पुरेशी ठरत नाही. चारही बाजूला निराशेचे सावट असते व त्यातून बाहेर पडण्यासाठी काही मार्ग दिसत नाही, अशी परिस्थिती निर्माण झाल्यानंतरच आत्महत्येसारखे टोकाचे पाऊल तेव्हा उचलले जाते. अशी निराशा काही शेतकऱ्यांना नव्हे तर अख्ख्या शेतकरी समुदायावर दाटलेली आहे. शेतकऱ्यांना कर्जमाफी देण्यात यावी, या मागणीवर खूप जोर देण्यात आला व शेवटीकर्जमाफीझाली. मात्र आकडेवारी सांगते की परिस्थिती कितीही विपरित असली तरीही कर्जमाफीनंतरही शेतीवरचे संकट दूर झालेले नाही. रोज किमान दोन वेळेला जेवण नाही व डोक्यावर छत एवढी व्यवस्था करणे किंवा व्यवस्था न झाल्यास कोणाच्या तरी आश्रयाला जाणे हे दोनच विकल्प शेतकऱ्यांच्या मागे राहिलेल्या त्यांच्या पत्नीकडे उरतात. आतापर्यंत झालेल्या शेतकरी आत्म हत्यांच्या कुटुंबात जवळपास ७० टक्के स्त्रियांनी सासरीच राहणे पसंत केले. ज्या स्त्रियांची माहेरची स्थिती बरी होती त्यांनी माहेर गाठले. सासरी राहणाऱ्या
स्त्रियांमध्येही दोन प्रकार दिसून येतात; पहिल्या प्रकारात अशा स्त्रिया ज्या सासरच्या एकत्रित कुटुंबात किंवा सासू-सासऱ्यांसोबत राहात आहेव दुसऱ्या प्रकारात अशा स्त्रिया ज्या केवळ मुलाबाळांना घेऊन राहत आहेत. अर्थात प्रकार कोणताही असला तरी त्यांच्या समोरची आव्हाने सारखीच आहेत.

पतीच्या आत्महत्येनंतर तान्ह्या मुलीला घेऊन माहेरी आलेल्या छबीताई आज सात वर्षे झाली तरी माहेरीच राहत आहेत. सासरीजाण्याची त्यांची इच्छा ही नाही व तिथे त्यांचा व त्यांच्या मुलीचा निभाव ही होऊ शकणार नाही. माहेरी राहताना त्यांना स्वतःचे, मुलीचे व आई-वडिलांचे पोट भरावे लागते. आई-वडिलांच्या माघारी आपले व मुलीचे आणखी काय हाल होतील या चिंतेला त्यांना थोपवून घरावे लागते.

संगीताताई आपल्या दोन मुलांसह सासू-सासऱ्यांसोबत गेली आठ वर्षे राहत आहेत. पतीच्या आत्महत्येनंतर त्यांच्या सासू-सासऱ्यांच्या वागण्यात कमालीचा बदल झाला, त्यांना सून नकोशी झाली. त्यामुळे सुनेचा सतत अपमान करणे, तिच्याशी सतत वाद घालणे हे गेली आठ वर्षे सुरू आहे. हे सर्व नकोसे झाल्यामुळे संगीताताईंनी देखील विहिरीतउडी मारून आत्महत्या करण्याचा प्रयत्न केला, पण सुदैवाने त्यांना त्यांना वाचविण्यात यश आले. आता घरीहोणारे वादव भांडणे यांचा त्यांनी स्वीकार केला आहे. वरील दोन्ही उदाहरणांवरून लक्षात येते की, सासरी किंवा माहेरी राहिल्यामुळे त्यांच्या परिस्थितीत काही बदल झालेला दिसून येत नाही. स्वतःसाठी व मुलांसाठी या स्त्रियांना कष्ट करावे लागतात आणि वर घरच्यांची व बाहेरच्यांची बोलणीही ऐकावी लागतात.

शेती किंवा मजुरी या दोन उपजीविकेच्या साधनांवर या कुटुंबाचा गाढा ओढला जातो. फार क्वचितच काही महिलांना अंगणवाडी सेविकाकिंवामदतनीसाचेकाममिळाले.शेती करायची तरपैसाहालागतोचव खिशात पैसा नसताना कर्ज काढावेच लागते. कर्ज काढतानाही होणाऱ्या पिळवणुकीबाबत विजयाताईसांगतातकी,



पतीच्याआत्महत्येनंतर त्यांच्या सासू-सासऱ्यांनी त्यांनाही जीवनसंपविण्याचासल्लादिला होता, पण वडिलांच्या मदतीने त्यांना त्यांच्या हिश्श्याची तीन एकर शेती मिळाली, मात्र शेतीसाठी कर्ज काढायला आधीतीनमहिने इंडियन ओवरसीज बँकेच्या चकरा मारल्या. तेथीलअधिकारी त्यांना उद्या या,नंतर या असे सांगून टोलवत राहिले व पुन्हा वडिलांची मदत मिळाली व वडिलांच्या ओळखीमुळे त्यांना यूको बँकेतून कर्ज मिळाले. विजयाताई याअमरावती जिल्ह्यातील तिवसा तालुक्यात राहातात व त्यांना वाटते की केवळमजुरीकरून कुटुंबाचानिर्वाहहोऊशकत नाही. त्यामुळे मजुरी किंवा शेतीसोबत काही पूरक व्यवसाय करायलाच हवा.

बँकांनी कर्ज नाकारले तर बचतसमूह किंवा मायक्रो फायनान्स कंपन्यांकडून महिलांना शेतीत लागणारे पैसे कर्जाऊ घ्यावे लागतात. कंपन्यांकडून मोठी रक्कम मिळत नाही मात्रमायक्रो फायनान्स कंपन्या दारात कर्ज आणून देतात, मग त्या बदल्यात त्यांचे व्याजदर ही भरमसाठ असतात. मायक्रो फायनान्स कंपन्यांकडून घेतलेले कर्ज हे दर आठवड्याला नेमून दिलेल्या हप्त्याप्रमाणे फेडावे लागते, मग जसा परतफेडीचा दिवस जवळ येतो तसा पैशाची तजवीज करण्याचा तणाव वाढतो आणियातणावातकाहीविपरीत घटना घडतात.

अशीच एक घटना अमरावती जिल्ह्याच्या चांदूरबाजार तालूक्यातील मासोद गावात घडली. मायक्रो फायनान्स कंपनीचे कर्ज परतफेड करण्याचा हप्ता भरायचा होता व आज कधी ही कंपनीचे प्रतिनिधी हप्ता घ्यायला येतील व पैशाची सोय झाली नव्हती म्हणून एका महिलेने आपल्या लहान मुलाला सांगितले की, कंपनीचेप्रतिनिधी आले तर त्यांना सांग की आई घरी नाही. असे मुलाला सांगितल्यावरतिनेस्वतःलाधान्याच्या कोठीत कोंडून घेतले. मुलगा लहान होता, त्याला एवढेच कळले की आलेल्या पाहुण्यांना सांगायचे की आई घरी नाही. इकडे कोठीतून बाहेर पडण्याचा प्रयत्न करतांना कोठीचे झाकण त्यामहिलेकडूनउघडले गेले नाही. मुलगा खेळायलाबाहेर गेलाहोता. आतून तिने मारलेल्या हाका कोणापर्यंत ही पोहोचू शकल्या नाही व शेवटी कोठीत गुदमरल्यामुळे त्या बाईचा करूण अंत झाला.

पतीच्या आत्महत्येनंतर मागे राहिलेल्या या महिलांच्यासमोर जिथे रोज जगण्यासाठी आवश्यक असलेल्या पैशांची सोय नाही तिथे त्या आजारपण, मुलाबाळांची लग्न किंवा शेती याकरिता पैसा कुठुन आणतील? पुन्हा-पुन्हा कर्ज घेणे व ती फेडत राहणे, हा त्यांच्या जीवनाचा भाग झाला आहे.

असुरक्षितता, अभाव व सतत असणारा ताण यामुळे या महिलांचेआरोग्यखालावलेले आहे, पण स्वतःच्या आरोग्याकडे लक्ष द्यायला त्यांच्याकडे वेळहीनाहीवपैसाही नाही. मदत करणार्या सेवाभावी संस्थांमुळे काही कुटुंबातील महिलांच्या व मुलांच्या आरोग्याचे रक्षण झाले व मिळालेल्या मदतीमुळे कोसळणार्या छताला थोडा टेकू मिळाला. काही महिलांनी मजूरीसोबत शिवणकामाला सूरूवात केली जर काही महिलाशेतीमध्ये काम नसते तेव्हा स्वयंपाकाची कामे करतात तर काहींनी घरी डबेबनविण्याचेकाम सुरू केले. महिलांसोबत त्यांचीमुलेहीआपापल्यापरीनेहातभारलावतआहे. जी मुले वयाने थोडी मोठी आहेत. ती मंडपडेकोरेशनच्या कामाला जातात किंवा पेट्रोल पंप किंवा औषधांच्या दुकानात संध्याकाळी व रात्री काम करतात. मुली सहसा घर सांभाळतात व कधी-कधी शेतीत कामालाही जातात. अगदी बारा वर्षांच्या मुलीदेखील घर पूर्णपणे सांभाळतात कारण आईला घराकडे लक्ष द्यायला वेळही नसतो व शक्ती ही नसते. पतीच्या मृत्यूनंतर ज्या महिलांनी स्वतः शेती करायला सुरूवात केली तेव्हांत्यामहिलांना समजायला आले की शेती करणे सोपे नाही, शेतीसाठी लावावे तेवढे श्रम व पैसे कमीच आहेत, मात्र उत्पन्नाची हमी नाही, उत्पन्न झाले तरी भावाची हमी नाही. मात्र कितीही कठीण काळ आला तरी या स्त्रियांनी तोकाळघालवून, धडपडकरीत, अपार कष्ट करीत पतीच्या माघारी स्वतःला व मुलाबाळांना जगविण्याचे आव्हान स्वीकारले आहे. या स्त्रियांचे कौतुक तर करायलाच हवे व त्याचबरोबर गरजेपाटी वपरिस्थितीला टक्कर देण्याकरिता त्यांची धडपड व अर्थार्जनासाठी निवडलेले पर्याय हे सर्व शेतकरी वर्गापर्यंत पोहोचवायला हवेत. जेणेकरून, फक्त शेतकरी वर्गच नव्हे तर इतर सर्व समाज एकत्र जोर लावेलआणिशेतीवरील संकट संपवेल.

**(लेखिका विदर्भातील आत्महत्याग्रस्त शेतकरी कुटुंबातील महिलांसाठी काम करणाऱ्या कार्यकर्त्या आहेत.)**
**संपर्क : ९४२३२४०१२३**

# एका 'खात्या'ची गोष्ट

**बँकेत खातं आलं आणि पैसे त्याच्यात नियमित ठेवले म्हणजे पुरत नाही. ही बँक चालते कशी, आपले पैसे राखले कसे जातात, याचं आकलन असणं, हेही त्याच्या सोबतच गरजेचं आहे.**




सीए अजित जोशी
meeajitgmail.com

झरीनाचे बाबा गेले तेव्हा ती नुकतीच कॉलेजच्या शेवटच्या वर्षाला गेली होती. पुढच्या दहा दिवसांत कॉलेजची फी द्यायची होती. बाबांच्या बँक खात्यात पुरेसे पैसेही होते, पण त्यांनी बँकेमध्ये वारस नोंद केली नव्हती आणि खाते एकट्याच्या नावावर होते. संयुक्त नावावर नव्हते. साहाजिकच फी भरताना चक्क नातेवाईकांकडून पैसे उधार मागायची वेळ आली.

विद्याताई एक निवृत्त शिक्षिका. पेन्शनचे, जवळच्या गाळ्याच्या भाड्याचे आणि शिकवण्यांचे पैसे न चुकता बँकेत ठेवत असत. पण खातं होतं, त्यांच्या आणि मुलाच्या एकत्र नावावर आणि पासबुक वेळेच्या वेळेला भरून घ्यायची किंवा मुलाने भरून आणून दिलेलं पासबुक नजर तरी टाकून पाहायची गरज त्यांना कधीच वाटली नाही. एक दिवस अचानक लक्षात आलं की, त्यातले बरेचसे पैसे त्याने शेअर्समध्ये गुंतवण्यासाठी काढून घेतलेले आहेत आणि तिथे शेअर बाजारात ते पैसे बुडाले.

रियाच्या बाबांनी मोठ्या कौतुकाने कॉलेजमध्ये वापरायला म्हणून एटीएम कार्ड दिलेलं होतं. दर दिवसाआड रिया हौशीने त्यातून दोन-तीनशे रुपये काढायची. तिच्याच बँकेची शाखा जवळ असूनही, वेगवेगळ्या बँकांच्या एटीएममधून काढायची. वर्षभराने तिला कळलं की एका म हिन्याच्या पॉकेटमनीएवढे पैसे तर नुसते बँकांच्या चार्जेसपायी गेले होते.

पुष्पा घरोघरी धुणीभांडी करून कमाई करते. एक टक्का व्याज जास्त मिळेल, म्हणून एका छोट्या नागरी सहकारी बँकेत सगळे पैसे ठेवले. जावेला आणि नणंदेलाही ठेवायला उद्युक्त केलं. आता बँकेचे घोटाळे बाहेर आल्यावर सगळ्यांचेच पैसे अडकलेत. कष्टाची कमाई तर फसलेली आहेच पण वर घरच्यांचे टोमणे ऐकावे लागतात, ते वेगळेच!

खरं सांगायचं तर बँक ही काही आता आपल्यासाठी नावीन्याची गोष्ट नव्हे. पन्नास वर्षांपूर्वी झालेलं बँकांचं राष्ट्रीयीकरण आणि पंचवीस-तीस वर्षांपूर्वीचं खासगीकरण यांच्यानंतर आता भारतात देशभर नाव राखून असलेल्या सरकारी, खाजगी आणि विदेशी अशा किमान ५० बँका तर आहेतच. त्याशिवाय राज्यात शाखा पसरलेल्या अजून ५० बँका सहज असतील. केंद्र सरकारच्या जनधनसारख्या योजनांमुळे आता असंख्य कोटी भारतीयांची खातीही या बँकांतून आहेत. पण असं असलं तरी वर पाहिली तशी अनेक उदाहरण आपल्या आजूबाजूला आपल्याला दिसतात. बँकेत खातं आलं आणि पैसे त्याच्यात नियमित ठेवले म्हणजे पुरत नाही. ही बँक चालते कशी, आपले पैसे राखले कसे जातात, याचं आकलन असणं, हेही त्याच्या सोबतच गरजेचं आहे.

पहिली गोष्ट म्हणजे खातं कोणाचं असतं? तर खातेधारकाचं... पण खातेधारक एकाहून अधिक असू शकतात. त्यातही प्रकार असे असतात, की काही वेळेला दोघांच्या मिळून सहीने व्यवहार होऊ शकतात, काही वेळेला तिघांपैकी कोणाही दोघांच्या आणि काही वेळेला खात्यावर नाव आहे, त्यांच्यापैकी कोणाही एकाच्यासुद्धा सहीने व्यवहार होतात. शक्य असल्यास एकट्याच्या नावाने खातं असू नये. आता पगाराची खाती एकाच्याच नावाने निघतात, पण नाहीतर एकाच्याच नावाने खातं असेल आणि काही कारणाने ती व्यक्ती ऐनवेळेला उपलब्ध झाली नाही, तर ते खातंच अडकून जातं आणि झरीनाची अडचण झाली तशी अडचण होते. अर्थात त्या खातेधारकाला अपघात झाला किंवा कुठे दूरदेशी अडकायला झालं, तरी हीच अडचण होऊ शकते. म्हणूनच कोणीही एक/हयात असणारी व्यक्ती व्यवहार करू शकेल, हा प्रकार सगळ्यात उपयोगी ठरेल. मात्र दोघांच्या, खासकरून पतीपत्नींनी एकच खातं दोघांच्या मिळून नावावर ठेवलं असेल तरी काही प्रश्न उभे राहतातच. अशा वेळी



एकमेकांवरचा विश्वास हा महत्त्वाचा आहेच, पण त्याच्याच बरोबर थोडी-बहुत जागरूकताही आवश्यक आहे. अशा प्रकारे जर दोघांच्या नावावर संयुक्त खातं असेल, तर दोघांनीही नियमितपणे त्या खात्यात काय व्यवहार होत आहेत, ते पाहिलं पाहिजे आणि त्याबद्दल एकमेकांना सांगितलं पाहिजे, कमीतकमी पक्का विश्वास निर्माण होईपर्यंत तरी! शिवाय हे खूपच महत्त्वाचं आहे की न विसरता आपण खात्यावर नॉमिनेशन म्हणजे 'उद्याचा खातेदार' नोंदवला पाहिजे. आपल्याला काही बरे-वाईट झाल्यास हा नॉमिनी खातेदार होतो. शक्यतो आपलं स्वतःचं मूल हेच भविष्यात आपला खातेदार झालेलं चांगलं. ते कायद्याने सज्ञान नसेल, तर विश्वासू व्यक्तीला त्याचा 'पालक' (त्र्रीवळरप) करावं.

दुसरा प्रश्न येतो व्यवहार करताना. चेक अर्थात धनादेश म्हणजे काय असतं? तर आपण बँकेला चेकमार्गे सांगतो की आपल्या खात्यातले पैसे दुसऱ्याला देण्यात यावे. म्हणजे समजा एक उदाहरण घेऊ. आर्चीने परशाच्या नावाने १०,००० रुपयांचा चेक दिला. यात आर्चीची बँक आहे बँक ऑफ इंडिया आणि परशाची बँक ऑफ बडोदा.

आता परशा हा चेक घेऊन आपल्या बँक ऑफ बडोदाच्या खात्यात 'टाकतो', म्हणजे तो आपल्या बँकेला तो चेक देतो. मग ही बँक त्या चेकवर पाहून बँक ऑफ इंडियाच्या त्या शाखेला सांगते, की आम्हाला आर्ची नावाच्या तुमच्या खातेदाराने आमच्याकडील एका खातेदाराला पैसे द्यायला सांगितलेले आहेत. आर्चीची बँक याची खात्री करते की सही बरोबर आहे, नक्कल झालेली नाही आणि ते पैसे बँक ऑफ बडोदाला देते, परशाच्या खात्यात देण्यासाठी.

हा जर चेक क्रॉस्ड (खातेनिहाय) असेल, तर आर्चीच्या खात्यातून जे पैसे जातील, ते फक्त परशाच्या नावाने असणाऱ्या कोणत्या तरी बँकेच्या खात्यातच जावे लागतील. पण तोच चेक जर बेअरर असेल, परशाला असाही पर्याय आहे, की तो चेक घेऊन त्याने सरळ आर्चीच्या बँकेच्या शाखेत जावं आणि रोख रक्कम तिच्या खात्यातून हातात घ्यावी. पण हा प्रकार थोडा धोक्याचा आहे कारण यामध्ये समजा परशाने तो चेक हरवला, तर तो ज्या कोणा व्यक्तीच्या हाताला लागेल, ती त्याच्यावरची रक्कम मिळवू शकेल. म्हणूनच बेअरर चेकने केलेला व्यवहार हा कायद्यातही रोखीचाच व्यवहार मानला जातो. चेकच्या डाव्या वरच्या कोपऱ्यात दोन तिरक्या रेघा मारल्या आणि/किंवा चेकवरचा जी इशरीशी हा मजकूर खोडला कि तो क्रॉस्ड म्हणजेच 'खात्यापुरता' चेक होऊन जातो.

आता हाच किस्सा पुढे नेऊन आपण अशी कल्पना करू, की आर्चीच्या खात्यातच १०,००० रुपये नाहीत. अशा परिस्थितीत ते पैसे तिच्या खात्यातून दुसऱ्या कोणाला देणं शक्य नाही. तरीही जर तिने चेक दिलेला असेल तर तो बाउन्स किंवा डिसऑनर झाला, किंवा 'उलटला' असं म्हणता येईल. ही एक गंभीर गोष्ट आहे आणि यासाठी तुरुंगवासही होऊ शकतो. तेव्हा कोणालाही चेक देण्याआधी आपल्या खात्यात पैसे आहेत की नाही, हे तपासणं फारच गरजेचं आहे.

व्यवहार समजायला लागले की पुढचा विषय येतो, तो म्हणजे बँकेकडून आपल्याला मिळणारं व्याज आणि बँक आपल्याकडून घेते, ती वेगवेगळी शुल्कं, अर्थात चार्जेस! एक समजून घ्यायला हवं की बँकेकडून जे व्याज मिळतं, ते अगदीच कमी दराने. कारण बहुतेक बँका आणि खासकरून सरकारी किंवा मोठ्या खासगी/विदेशी बँका बुडायचा धोका हा जवळजवळ नसतोच. कमी धोक्यामुळे त्यावरचा दरही कमी असतो. किंबहुना काही छोट्या बँका जास्त दर द्यायला लागल्या की तिथे पैसे ठेवण्याआधी दहा वेळेला विचार करायला पाहिजे, तो यासाठीच. म्हणूनच सगळे पैसे, जर ते बऱ्यापैकी जास्त असतील, तर एका बँकेत ठेवू नये आणि त्यात अशा छोट्या अर्बन सहकारी वगैरे पद्धतीच्या बँकांत तर मुळीच ठेवू नयेत, हे उत्तम! दुसरी बहुतेकांना माहीत नसलेली गोष्ट म्हणजे आता रिझर्व्ह बँकेच्या नियमानुसार बँका रोज व्याजाचा हिशेब करतात. तेव्हा तुमच्या हाता चेक/रोख आली की लगेच, ती बँकेत जाऊ द्या, व्याजाचा मीटर लगेच चालू होईल. गेल्या काही काळात बँकेसंदर्भात नव्याने उभा राहिलेला विषय म्हणजे बँक चार्जेस. हे चार्जेस कमीत कमी लागावे अशी अपेक्षा असेल तर आपल्याला तसं नियोजन करायला हवं. म्हणजे महिन्यात ठरावीक मर्यादेपर्यंत एटीएमचा वापर फुकट आहे, किंवा स्वतःच्या शाखेतून पैसे एटीएमने काढले तर काही सवलती आहेत, असे अनेक नियम आहेत. बहुतेक बँका किमान काही रक्कम खातेदाराने खात्यात शिल्लक ठेवावी, अशी अपेक्षा बाळगतात. ही किमान रक्कम सरकारी बँकाच्या बाबतीत कमी असते. ती नाही बाळगली तर शुल्क लागू होतं. आपण जर हा हिशेब केला की महिन्यात आपल्याला किती रक्कम लागणार आहे आणि त्या प्रमाणात किमान खेपांत आवश्यक ते पैसे काढले तर शुल्क टाळता येईल. तशीच किमान रक्कम खात्यात किती असायला पाहिजे त्याचाही हिशेब मांडता येईल. ही जी किमान शिल्लक आहे, हा सरासरी काढतात. तेव्हा आठ-दहा दिवस तुमच्या खात्यात किमान रक्कम नसेल, तर उरलेले दिवस आवश्यकतेपेक्षा जास्त रक्कम ठेवून तुम्ही त्याची भरपाई करू शकता. शिवाय डिजिटल व्यवहारांचा चांगला उपयोग करूनही ही शुल्क कमी करता येतात, ते आपण नंतर पाहूच!

बँक खातं ही सुरुवात आहे. तिच्यावर पकड आली की पुढे जोरदार घोडदौड करता येईल!

(लेखक चार्टर्ड अकौंटंट असून,
**PTV's Institute of Management** या विलेपार्ले, मुंबई येथील
**Management Institute** मध्ये अध्यापक आहेत.)




सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या तत्त्वज्ञान विभागाच्या वतीने आयोजित विशेषांक प्रकाशन सोहळा महाराष्ट्र राज्य महिला आयोगाच्या अध्यक्षा विजया रहाटकर यांच्या हस्ते पार पडला. डॉ हेमा मोरे, डॉ अनिरुद्ध जोशी, तत्वज्ञान विभाग प्रमुख प्राध्यापक रवींद्र मुळये, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे कुलगुरू डॉ नितीन करमळकर, संत साहित्याचे अभ्यासक जेष्ठ साहित्यिक डॉ सदानंद मोरे, प्राध्यापिका सुरजितकौर चहल आणि लता छत्रे आदी उपस्थित होते. Indian Philosophical Quarterly (IPQ), स्त्री अभ्यास विशेषांक, भारतीय ज्ञानमीमांसा 'परामर्श'च्या मराठी तसेच हिंदी आवृत्तीचे प्रकाशन यावेळी करण्यात आले. तत्त्वज्ञ दर्शन या जेष्ठ तत्त्वज्ञाच्या मुलाखती असलेल्या डीव्हीडी संचाचेही प्रकाशन यावेळी करण्यात आले.



औरंगाबाद येथे १३ एप्रिल रोजी पोलिस आयुक्तालयात महिला कर्मचाऱ्यांसाठी सॅनिटरी नॅपकिन व्हेंडिंग मशिनचे उद्घाटन करताना राज्य महिला आयोगाच्या अध्यक्ष विजया रहाटकर सोबत पोलिस आयुक्त मिलिंद भारंबे, उपायुक्त डॉ. दीपाली धाटे-घाडगे आदी.




राज्य महिला आयोगाच्या अध्यक्ष विजया रहाटकर यांनी लिहिलेल्या 'कानून आप के लिये' या हिंदी पुस्तकाचे प्रकाशन उत्तर प्रदेशातील गाझियाबाद येथे झालेल्या कार्यक्रमात भारतीय जनता पक्षाचे अध्यक्ष अमित शहा यांच्या हस्ते करण्यात आले. या वेळी केंद्रीय मंत्री व्ही. के. सिंह व इतर उपस्थित होते.




महिला सक्षमीकरणासाठी पुदुच्चेरी येथे सुरू करण्यात आलेल्या राजमाता सेवा केंद्रांच्या उद्घाटनप्रसंगी नायब राज्यपाल किरण बेदी यांच्या समवेत राज्य महिला आयोगाच्या अध्यक्ष विजया रहाटकर.



महिला सक्षमीकरणासाठी पुदुच्चेरी येथे सुरू करण्यात आलेल्या राजमाता सेवा केंद्रांचे उद्घाटन करताना राज्य महिला आयोगाच्या अध्यक्ष विजया रहाटकर.




औरंगाबाद येथे आयोजित महिला आरोग्य शिबिराच्या उद्घाटनप्रसंगी बोलताना राज्य महिला आयोगाच्या अध्यक्ष विजया रहाटकर.



# आयोगाच्या प्रयत्नांमुळे झाली पुनर्भेट

**मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी राबविलेल्या योजनांचा आँखो देखा हाल पत्रकार आशिष चांदोरकर यांनी 'मॅन ऑन मिशन महाराष्ट्र' या पुस्तकात शब्दबद्ध केला आहे. या पुस्तकाचे प्रकाशन नुकतेच झाले. सादच्या वाचकांसाठी या पुस्तकातील यशोगाथा दरमहा देत आहोत.**

## आशिष चांदोरकर


**दोन ओंडक्यांची होते, सागरात भेट**
**एक लाट तोडी दोघा, पुन्हा नाही गाठ...**

आधुनिक वाल्मिकी ग. दि. माडगूळकर यांनी रचलेल्या गीत रामायणाच्या एका गीतातील या दोन अजरामर ओळी. गीत रामायणात या दोन ओळी वेगळ्या संदर्भासाठी वापरण्यात आलेल्या आहेत. पण तरीही औरंगाबादमधील एका घटनेच्या निमित्ताने त्या ओळी आवर्जून आठवल्या. मोठ्या भावाने पंधरा वर्षांपूर्वी ताटातूट झालेल्या आपल्या भावा-बहिणींना मोठ्या मेहनतीने शोधून काढले आणि आज ते तिघे पुन्हा एकदा एकत्र आले आहेत. आज जर गदिमा असते तर डोळ्यात पाणी आणणाऱ्या या घटनेचं वर्णन करण्यासाठी त्यांनी नक्कीच चार ओळी लिहिल्या असत्या...

ही गोष्ट आहे अमोल बापूराव मगर याची... अमोल आणि त्याचे कुटुंबीय औरंगाबाद जिल्ह्यातील कन्नड तालुक्यातील लिंब चिंचोली गावचे. घरात आई-वडील आणि लहान भाऊ-बहीण. पण वडिलांनी दुसरं लग्न केलं आणि मगर कुटुंबीयांचे वासे फिरले. दुःख आणि प्रतिकूल परिस्थितीनं मगरमिठीच मारली जणू त्यांना. अमोलवर दुःखाचा आणखी एक डोंगर कोसळला. आईचं २००१मध्ये निधन झालं. त्यावेळी अमोल होता ११ वर्षांचा. त्याची छोटी बहीण निकीताचं वय होतं अवघं दीड वर्ष आणि लहान भाऊ अनिकेत होता फक्त आठ महिन्यांचा. नियती देखील एखाद्याची किती परीक्षा बघते, हे अमोल

आणि त्याच्या भावंडांकडे पाहिल्यानंतर कळतं.

भावंडं लहान असल्यामुळं अमोलनं त्यांना शिशुसदनमध्ये ठेवलं आणि तो काकांबरोबर राहू लागला. रेल्वे स्टेशनजवळच्या पब्लिक हायस्कूलमध्ये त्यानं शिक्षण घेतलं. नंतर एक वर्ष हडकोच्या रिमांड होममध्ये तो होता. पद्मपुरा भागातील शिशुसदनमध्ये असलेल्या भावंडांशी अमोलचा नियमित संपर्क होता. ते शिशुसदन २००२ मध्ये बंद झाले. त्यानंतर दोघांना सुरुवातीला पुणे आणि नंतर यवतमाळला पाठविण्यात आले. साधारण २००४पर्यंत अमोलचा निकिता आणि अनिकेतशी संपर्क होता. नंतर त्यांचा संपर्क तुटला तो कायमचाच.




अमोलने भावंडांचा शोध घेण्यासाठी जंगजंग पछाडले. आख्खा महाराष्ट्र पिंजून काढला. पुणे, यवतमाळ, नाशिक, उस्मानाबाद आणि नांदेड येथे जाऊन आला. इकडून तिकडे आणि तिकडून आणि तिसरीकडे असा त्याचा फुटबॉलच झाला होता. त्याने सांगितलेल्या प्रत्येक सरकारी कार्यलयांचे उंबरठे झिजविले. पण त्याला यश काही आलं नाही. अमोलने सध्या वाळूज येथे स्वतःचा व्यवसाय सुरू केलेला आहे. त्याने पुन्हा एकदा नव्याने शोध सुरू केला. पद्मपुऱ्यातील शिशुसदनची जागा आता अनुरक्षणगृहाने घेतली आहे. तिथं संपर्क साधला पण कोणतेच रेकॉर्ड नव्हते. नंतर त्याला हडकोच्या रिमांड होममध्ये, पुढे जिल्हा महिला आणि बालविकास विभागाकडे धाडण्यात आले. तिथेही कोणी दाद देईना म्हटल्यावर २७ वर्षीय अमोलने १७ मे २०१७ रोजी शिशुसदनविरुद्ध पोलिसांत तक्रार दाखल केली.

पोलिस आयुक्त, जिल्हाधिकारी कार्यालय आणि इतर ठिकाणीही त्याने अर्ज दाखल केला. मात्र, रेकॉर्ड उपलब्ध नसल्याच्या सबबीखाली तपास पुढे जायलाच तयार नव्हता. प्रश्न फक्त अमोलच्या दोन भावंडांचा होता असे नाही. तर त्या शिशुसदनमध्ये त्यावेळी असलेल्या जवळपास शंभर बालकांचा होता.  त्यामुळे राज्य महिला आयोगाने स्वतःहून या प्रकरणाची दखल घेतली आणि आयोगाच्या अध्यक्षा विजयाताई रहाटकर यांनी महिला व बालविकास विभागाच्या अधिकाऱ्यांना आयोगासमोर हजर राहण्याचे आदेश दिले. विजयाताईंनी या प्रकरणामध्ये स्वतः लक्ष घातले. संबंधित विभाग, अधिकारी आणि यंत्रणांशी संपर्क साधला. विजयाताईंच्या पाठपुराव्यामुळे त्यावेळी शिशुसदनशी संबंधित व्यक्ती आणि अधिकारी यांचा तातडीने शोध घेण्यात आला. तपासाची चक्रे वेगाने फिरू लागली आणि मार्ग सापडत गेला. माध्यमांनीही या मध्ये मोलाची भूमिका बजावली.

शिशुसदन बंद झाले तेव्हा त्या संस्थेतील मुलांना जवळपासच्या संस्थांमध्ये सामावून घेण्यात आले होते. त्यांची व्यवस्था आजूबाजूच्या संस्थांमध्ये करण्यात आली होती. तेव्हाच्या संस्थांमध्ये फॉलोअप घेण्यात आला. मात्र, तिथे निकिता आणि अनिकेत यांचा शोध लागला नाही. त्यावेळी पुण्यातील प्रीतमंदिर ही संस्था औरंगाबादमध्ये कार्यरत होती. नंतर काही कारणाने ती संस्था बंद पडली. त्यामुळे प्रीतमंदिरमध्ये दोघे आहेत का, याचा तपास करण्यात आला. बालकल्याण समितीच्या एडव्होकेट रेणुका घुले यांनी प्रीतमंदिरला या संदर्भात विचारणा केली.

सर्वांनी घेतलेल्या मेहनतीला आणि धावपळीला यश आले. निकिता आणि अनिकेत हे २००६ पासून लोणावळ्यातील आंतरभारती बालगृहात असल्याचे समजले. त्यांचे शिक्षण व्यवस्थित सुरू असल्याचीही माहिती मिळाली. अमोल आणि भावंडांची इच्छा असेल तर दोघांनाही पुन्हा एकदा औरंगाबादला आणता येईल, असे रेणुका घुले यांनी स्पष्ट केले. दोन्ही भावंडे सापडल्यानंतर अमोलच्या आनंदाला तर पारावारच उरला नाही. हरवलेलं आयुष्यच आपल्याला परत मिळालं, अशी प्रतिक्रिया त्यानं व्यक्त केली. आतापर्यंत आयुष्य कसं जगलोय हे माझं मला माहितीय. भाऊ-बहीण हरविल्यामुळं माझ्या आयुष्याला काहीच अर्थ उरलेला नाही, असं वाटत होतं. पण आता दोघेही सापडले आहेत. त्यामुळं माझ्या आईच्या मृतात्म्याला आज शांती मिळाली असेल, असा मला विश्वास आहे.

महिला आयोगाने स्वतःहून या प्रकरणात लक्ष घातले आणि पाठपुरावा केला म्हणून तपासाला वेग आला. तपासाचा वेग आणि व्याप्ती वाढल्यामुळे आज अमोल आणि भावंडांची भेट झाली आहे. ते तिघेही पुन्हा एकदा एकत्र आल्यामुळे मला वैयक्तिक आणि महिला आयोगाच्या सर्व पदाधिकाऱ्यांना खूप आनंद झाला आहे. आयुष्यात एक महत्त्वाचे पुण्याचे काम केल्याची भावना माझ्या मनात आहे, अशा शब्दांत विजयाताईंनी या प्रकरणी प्रतिक्रिया व्यक्त केली. आतापर्यंत सरकारी यंत्रणांकडून जो हलगर्जीपणा झाला, तसा प्रकार यापुढे कधीही होणार नाही. महिला आणि बालविकास विभाग योग्य त्या नोंदी अगदी व्यवस्थितपणे ठेवेल, असेही विजयाताईंनी सांगून टाकले.

अमोल, निकिता आणि अनिकेत आज पुन्हा एकदा एकत्र आले आहेत. अमोलचा सतरा वर्षांचा वनवास संपला आहे. एकटेपणा दूर झाला आहे. आता पुन्हा एकदा ते तिघे एकत्र येतील आणि सुखाने नांदू लागतील, असा अगदी चित्रपटाला साजेसा या गोष्टीचा शेवट आहे. राज्य महिला आयोगाने स्वतःहून घेतलेला पुढाकार आणि दाखविलेले स्वारस्य यांच्यामुळे आज एक कुटुंब एकत्र आले आहे. जोडले गेले आहे. अमोलच्या जिद्दीला आणि महिला आयोगाच्या कर्तव्यनिष्ठेला सलाम...




# ‘मॅन ऑन मिशन महाराष्ट्र’चे थाटात प्रकाशन

साद प्रतिनिधी

‘मॅन ऑन मिशन महाराष्ट्र’ या मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या कारकीर्दीचा आढावा घेणाऱ्या पुस्तकाचे प्रकाशन नितीन गडकरी यांच्या हस्ते झाले. त्या वेळी ते बोलत होते. पुण्यातील पत्रकार आशिष चांदोरकर यांनी हे पुस्तक लिहिले असून साकेत प्रकाशनने ते प्रकाशित केले आहे. भाजपचे राष्ट्रीय प्रवक्ते शहानवाज हुसेन, राज्याचे अर्थमंत्री सुधीर मुनगंटीवार, अन्न व नागरी पुरवठामंत्री गिरीश बापट, जलसंपदामंत्री गिरीश महाजन, ऊर्जामंत्री चंद्रशेखर बावनकुळे, पशुसंवर्धनमंत्री महादेव जानकर आदी या वेळी उपस्थित होते.

पाणीप्रश्न सोडवण्याचे मोठे काम करणारे, महाराष्ट्र बदलणारे नेतृत्व म्हणून देवेंद्र फडणवीस यांची राज्याच्या इतिहासात नोंद होईल. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे विकासाची दृष्टी आहे. निर्णय घेण्याची क्षमता आहे. त्या आधारावर फडणवीस यांनी जलयुक्त शिवार, रखडलेले सिंचन प्रकल्प पूर्ण करण्यासारख्या कामातून पाण्याच्या क्षेत्रात मोठे काम केले आहे. जलसंपदा खाते माझ्याकडे आल्यावर त्यांनी हक्काने कामे करून घेतली. जलयुक्त शिवारातून दुष्काळी गावांत पाणीसाठा निर्माण केला. फडणवीस यांच्या प्रयत्नांमुळे पुढील दोन वर्षांत राज्यातील सिंचनाचा टक्का ४० टक्क्यांपर्यंत जाईल, असे नितीन गडकरी भाषणात म्हणाले.

‘‘हे पुस्तक म्हणजे महाराष्ट्र सरकारने गेल्या साडेतीन वर्षांत घेतलेल्या महत्त्वाच्या निर्णयामुळे ज्यांच्या जीवनात बदल घडले, अशांच्या अनुभवांचे संकलन आहे. त्यामुळे हे मिशन माझ्या एकट्याचे नसून, मंत्रिमंडळातील माझ्या सहकाऱ्यांचे आहे. हे पुस्तक म्हणजे सरकारने घडविलेल्या परिवर्तनाची गाथा आहे. राज्य चालवताना रोज नव्या समस्यांना सामोरे जावे लागते. मात्र, सकारात्मकतेने या समस्यांना सामोरे गेल्यास प्रश्न सुटतात,’’ असे मुख्यमंत्री म्हणाले.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या राजकीय कारकिर्दीचा आढावा या पुस्तकात घेण्यात आला आहे. त्याचप्रमाणे राज्य सरकारच्या तीन-साडेतीन वर्षांच्या काळात भाजप कशा पद्धतीने कायमच प्रथम क्रमांकावर राहिला, याचे विश्लेषण पुस्तकामध्ये आहे. फडणवीस सरकारच्या विविध योजना आणि निर्णयाचा सामान्य नागरिकांना, कुटुंबांना तसेच समुदायांना कसा फायदा झाला आणि त्यांचे जीवनमान कशा पद्धतीने सुधारले, या संदर्भातील यशोगाथांचा पुस्तकात समावेश आहे. राज्याच्या २०हून अधिक जिल्ह्यांमध्ये पाच हजारहून अधिक किलोमीटरचा प्रवास करून, विविध समाजघटकांशी बोलून आणि प्रत्यक्ष परिस्थितीचा आढावा घेत या पुस्तकाचे लेखन करण्यात आलेले आहे.

# महिलांसाठी हेल्पलाइन क्रमांक

महिला आपल्या संरक्षणासाठी, अन्याय होत असताना मदत मागण्यासाठी या ठिकाणी फोन करू शकतात.

**राज्य महिला आयोगाची ‘सुहिता’ हेल्पलाइन**
०२२-७४७७७२२४२४

**महिलांसाठी स्वतंत्र पोलिस हेल्पलाइन, पुणे**
०२०-२६०५०१९१ (www.punepolice.gov.in )

**पुणे नियंत्रण कक्ष**
०२०-२६१२६२९६

**पुणे महिला साह्य कक्ष**
०२०-२६२०८३४१

**पुणे सखी हेल्पलाइन**
०२०-२४४८४५३५

**आय लव्ह मुंबई आणि सकाळ**
८८८८८०९३०६

**पुणे गुन्हे शाखा कक्ष**
०२०-२६११२२२२,
२६२०८२९५

**हेल्पलाइन**
१८१

**स्त्री सन्मान हेल्पलाइन**
०२२-८८८८८०९३०६

**नवी दिल्ली हेल्पलाइन**
१८२



# ‘सखी-रूपे’री...

**सिनेमा हा आपल्या सगळ्यांच्या आवडीचा विषय. या सिनेमात वेगवेगळ्या रूपांनी स्त्रीचं दर्शन घडत असतं. कधी ते खूप सुखावणारं, सुंदर, प्रेमळ, स्नेहल असं असतं, तर कधी खूप आक्षेपार्ह, वाईट, विचित्र, ओंगळवाणंही असतं. काहीही असलं, तरी रूपेरी पडद्यावरची स्त्री प्रतिमा हा आपल्या सगळ्यांच्याच औत्सुक्याचा आणि आवडीचा विषय असतो. अशाच काही समकालीन स्त्री-प्रतिमांचा, कलाकृतींचा वेध घेणारा आणि त्यामागचा अन्वयार्थ शोधण्याचा प्रयत्न करणारा नवा स्तंभ... या अंकापासून...**

अनिरुद्ध नगरकर

भारतीय सिनेमाला गेल्याच महिन्यात म्हणजे ३ मे २०१८ रोजी १०५ वर्षं पूर्ण झाली. सुरुवातीचा काही काळ सोडला, तर स्त्रिया या चित्रपटसृष्टीचा अविभाज्य भाग आहेत. कमलाबाई गोखले (विक्रम गोखले यांच्या आजी) या रूपेरी पडद्यावर झळकलेल्या पहिल्या भारतीय महिला. त्यानंतर आजतागायत हजारो महिलांनी या जादुई पडद्यावर आपलं अस्तित्व अजरामर केलंय. सुरुवातीला पडद्यावर आणि नंतर पडद्यामागे स्पॉटबॉयपासून ते दिग्दर्शनापर्यंत जवळपास प्रत्येक क्षेत्रात स्त्री झळकली आहे. आता एकविसाव्या शतकाचं दुसरं दशक संपत आलं असताना तर सिनेमाच्या क्षेत्रात महिलांना येत नाही असं कदाचित एकही क्षेत्र शिल्लक नसेल.

पडद्यावरच्या स्त्री-प्रतिमांचा विचार करता, सुरुवातीच्या काळात फक्त पारंपरिक आणि पौराणिक सिनेमे तयार होत. त्यामुळं स्त्रियांना देवी आदी पौराणिक भूमिकाच कराव्या लागत असत. पुढे काळ बदलत गेला. स्त्रिया सर्व प्रकारच्या भूमिका करू लागल्या. स्टंटपटांपासून ते सामाजिक चित्रपटांपर्यंत आणि कौटुंबिक चित्रपटांपासून ते रोमँटिक सिनेमांपर्यंत स्त्रिया सर्वत्र संचार करू लागल्या. दादासाहेब फाळके यांनी ‘राजा हरिश्चंद्र’ हा पहिला मूकपट तयार केला, तेव्हा सिनेमात काम करणं हे हलकं समजलं जात होतं. अगदी वेश्यांनीही ‘आम्ही असलं हलकं काम करीत नाही,’ असं सांगून दादासाहेबांना नकार दिला होता. तिथपासून आजच्या काळापर्यंत १०५ वर्षांत सिनेमानं आणि या रूपेरी पडद्यावरच्या स्त्रीनं अगदी क्रांतिकारी म्हणावा असा बदल अनुभवला. आज एकविसाव्या शतकात तर या तंत्राधिष्ठित कलेत प्रचंड बदल झाले आहेत.

भारतात १९९१ नंतर जागतिकीकरणाचं युग अवतरलं. वर्षानुवर्षं गाढ निद्रेत असलेला भारतीय मध्यमवर्गीय समाज जणू खडबडून जागा झाला. त्याला प्रगतीच्या अनेक संधी उपलब्ध झाल्या. चांगल्या मार्गानं कष्ट करून पैसा मिळवता येतो आणि तो उत्तमरीत्या उपभोगता येतो, याची नवी जाणीव इथल्या मध्यमवर्गाला झाली. एकविसाव्या शतकात पदार्पण करताना

भारतात मल्टिप्लेक्सचं आगमन झालं. या सगळ्या बदलांचा परिणाम इथल्या सिनेमावर होत गेला. सिनेमा व्यवसायाचं कॉर्पोरेटायझेशन झालं. वाजपेयी सरकारच्या काळात सुषमा स्वराज माहिती व प्रसारण मंत्री असताना त्यांनी हा क्रांतिकारी निर्णय घेतला. या निर्णयाचा फायदा सिनेमासृष्टीला नकळत फार मोठ्या प्रमाणावर झाला. छोट्या शहरांतून अनेक गुणवंत मुलं मायानगरी मुंबईत नशीब काढायला पूर्वीपासून येत. पण आता त्यांच्या गुणवत्तेला संधी लाभली. खास मल्टिप्लेक्सच्या प्रेक्षकवर्गासाठी लो बजेटचे चित्रपट तयार होऊ लागले. विशिष्ट प्रेक्षकवर्ग डोळ्यांसमोर ठेवूनच सिनेमा तयार होत असल्यानं त्यात विषयांचं प्रचंड वैविध्य आलं. कधीही हाताळले न गेलेले विषय बॉलिवूड हाताळू लागलं. अनुराग कश्यप, विशाल भारद्वाज, फरहान अख्तर, दिबाकर बॅनर्जी, झोया अख्तर, मेघना गुलजार, विक्रमादित्य मोटवानी, सुजित सरकार, निशिकांत कामत अशा नव्या दिग्दर्शकांची फळी मैदानात उतरली. त्यांनी नव्या पिढीच्या संवेदनशीलतेला सुसंगत असे चित्रपट तयार करायला सुरुवात केली. 'दिल चाहता है' (२००१) हा या नव्या लाटेतला पहिला चित्रपट. त्यानंतर हिंदी चित्रपट खऱ्या अर्थानं बदलला, एकविसाव्या शतकात प्रविष्ट करता झाला, असं म्हणता येईल.

या सर्व काळात महिलांचं या चित्रपटसृष्टीला असलेलं योगदान खूपच मोलाचं ठरलं आहे. फिअरलेस नादिया, देविकाराणी, दुर्गा खोटे यांच्यापासून ते अगदी आत्ताच्या कंगना रनोट, आलिया भटपर्यंत किती तरी स्त्रियांनी ही चित्रपटसृष्टी गाजवली आहे. नर्गिस, मधुबाला, नूतन, वहिदा रेहमान, आशा पारेख, वैजयंतीमाला, हेमामालिनी, रेखा, झीनत अमान, स्मिता पाटील, शबामा आझमी, श्रीदेवी, माधुरी दीक्षित, विद्या बालन अशा कित्येक सुपरस्टार नायिकांनीही आपापल्या कर्तृत्वानं इथं रूपेरी पडदा गाजवला. अपर्णा सेनपासून ते झोया अख्तरपर्यंत अनेक नामवंत दिग्दर्शिकांनीही आपलं नाव इथं कोरलं. उषा खन्नांसारख्या संगीत दिग्दर्शिकेनं आपलं वेगळं अस्तित्व राखलं. लता मंगेशकर, आशा भोसले, शमशाद बेगम, गीता दत्त, सुमन कल्याणपूर, अनुराधा पौडवाल, अलका याज्ञिक, कविता कृष्णमूर्ती, श्रेया घोषाल अशा सुंदर आवाजांच्या गायिकांनी इथलं स्वरविश्व सदैव आपल्या सूरांनी उजळवत ठेवलं.

चित्रपटांच्या विषयांमध्ये, आशयामध्येही या सर्व शतकाभराच्या काळात खूपच बदल झाले. स्त्रीच्या कणखर रूपाचं दर्शन घडविणारे अनेक चित्रपट सुरुवातीपासून तयार होत गेले. मेहबूब खान, बिमल रॉय, सत्यजित राय, श्याम बेनेगल ते थेट झोया अख्तर, मधुर भांडारकरांपर्यंत अनक दिग्दर्शकांनी स्त्रियांचं रूपेरी चित्रण प्रभावीपणे केलं.

पडद्यावरच्या स्त्री-व्यक्तिरेखांप्रमाणेच इथं प्रत्यक्षात वावरणाऱ्या स्त्रियांचे जीवनही अनेकांच्या कुतूहलाचा कायम विषय राहिले आहे. अगदी परवा परवा महिलांच्या चित्रपटसृष्टीत होणाऱ्या लैंगिक शोषणाविरुद्ध काही महिलांनी आवाज उठवला. काही जणींनी 'हे पूर्वीपासूनच चालत आलं आहे, त्यात विशेष काय,' अशाही प्रतिक्रिया दिल्या. 'कास्टिंग काउच' (भूमिका किंवा कुठलंही काम मिळवून देण्याच्या बदल्यात शरीरसुखाची मागणी करण्याचा प्रकार) याबाबत तर सातत्यानं चर्चा होताना दिसते. मुंबईसारख्या मोहनगरीत देशभरातून रोज शेकड्यानं तरुण-तरुणी सिनेमात नशीब काढायला येत असतात. गुणवत्ता असूनही काहींना संधी मिळत नाही. काहींना गुणवत्ता नसतानाही, शॉर्टकट वापरून त्वरित यश मिळवायचं असतं. त्यातून 'कास्टिंग काउच'सारखे प्रकार होताना दिसतात.

या स्तंभात यापुढं भारतीय स्त्री आणि सिनेमा या विषयावर प्रसंगोचित चर्चा केली जाईल. स्त्रीचं सामर्थ्य दाखवणारा एखादा समकालीन सिनेमा किंवा स्त्रियांचे प्रश्न हाताळणारी कलाकृती यांवर भाष्य केलं जाईल. बेगम जान, लिपस्टिक अंडर माय बुरखा, पिंक किंवा न्यूडसारख्या महिलाकेंद्री चित्रपटांचं आस्वादक रसग्रहणही केलं जाईल.

**तेव्हा भेटत राहू 'सखी-रूपे(री)'मध्ये...**





## अँजेला मर्केल - जर्मनीच्या चॅन्सेलर

# खंबीर अन् सावध



**गोपाळ जोशी**

जर्मनीच्या चँन्सलरपदी सलग चौथ्यांदा निवडून आलेल्या अँजेला मर्केल यांची कणखर अन् कर्तव्यदक्ष नेत्या म्हणून जगभर ओळख आहे. आणीबाणीच्या प्रसंगीही न डगमगता आपला मुद्दा पुढे रेटण्याचे त्यांचे कसब वादातीत आहे. त्यामुळेच गेल्या दीड तपांहून अधिक काळ जर्मनीच्या अर्थव्यवस्थेला सातत्याने चढती कमान दाखवण्याचे कसब साधलेल्या मर्केल यांच्याकडे युरोपच्या नेत्या म्हणूनही पाहिले जाते.

दुसऱ्या महायुद्धानंतर युरोपने अनेक उलथापालथी पाहिल्या. दुभंग जर्मनी, पश्चिम व पूर्व युरोपातील उत्तरोत्तर टोकाला गेलेले शीतयुद्ध, तत्कालीन सोव्हिएत युनियनचा अस्त व त्यानंतर पूर्व युरोपात एकामागोमाग एक धडाधड कोसळत गेलेल्या हुकूमशाही राजवटी, जर्मनीचे एकत्रीकरण, २००८ मध्ये अमेरिकी सबप्राईम गैरव्यवहारामुळे मंदीच्या गर्तेत सापडलेला युरोप आणि याच आर्थिक तंगीतून युरोपीय समुदाय व युरोबाबत उभे राहिलेले प्रश्नचिन्ह, अशा अनेक घडामोडींचा परिणाम युरोपवर झाला असून, त्यातून युरोपीय समुदायाचा मानसिक लंबक सतत दोलायमान राहिला आहे. अशा कसोटीच्या काळात मर्केल यांनी अत्यंत खंबीरपणे जर्मनीचे नेतृत्व करत देशाची मान सतत उंचावत ठेवली आहे. राजकारणाचा तसा कोणताही वारसा नसताना त्यांनी मिळवलेले हे यश म्हणूनच अधिक वेगळे भासते.

अँजेला मर्केल यांचा जन्म १९५४ मध्ये तत्कालीन पश्चिम जर्मनीतील  हॅम्बुर्ग शहरात झाला. अँजेला डोरोथी कास्नेर असे त्यांचे नाव होके. त्यांचे वडिल होर्स्ट कास्नेर धार्मिक होते. पूर्व जर्मनीतील पूर्व बर्लिनजवळच्या छोट्या गावातील चर्चमध्ये पाद्री म्हणून त्यांना नियुक्ती मिळाल्याने कास्नेर कुटुंब पूर्व जर्मनीत स्थलांतरित झाले. तेव्हा अँजला अवघ्या तीन महिन्यांच्या होत्या. अँजेला यांच्या आई हेर्लिंड इंग्रजी व लॅटिनच्या शिक्षिका होत्या. त्यावेळी पूर्व जर्मनीत साम्यवादी राजवट होती आणि या राजवटीवर तत्कालीन सोव्हिएत युनियनचा वरचष्मा होता. साहजिकच कम्युनिस्ट हा एकच पक्ष आणि तो ठरवील तीच पूर्व. पक्षाचे सदस्यत्व घेतल्याशिवाय उच्च शिक्षण, नोकरी, व्यवसायवगैरे सगळेच अवघड. एका परीने सगळे जीवनच पार्टीवर अवलंबून होते. त्या काळात, वयाच्या तेरा चौदाव्या वर्षी अँजेला यांनी फ्री जर्मन यूथ (एफडीजे)

**जगभरात महिलांनी आपल्या कर्तृत्वाचा ठसा उमटवला आहे. मग तो राष्ट्रप्रमुख म्हणून असेल वा अभिनेत्री म्हणून असेल किंवा खेळाडू म्हणून असेल. महिलांनी आपापल्या क्षेत्रात सर्वोच्च स्थान प्राप्त केले आहे. अशाच काही कर्तृत्ववान महिलांचा परिचय करून देणारे हे नवे सदर.**

// स्त्रीशक्तिरतुल्या सदा //

या कम्युनिस्ट पक्षाच्या युवा शाखेत प्रवेश केला. त्या काळी पक्षात प्रवेश केलेल्या युवकांना मार्क्सवाद, लेनिनवाद शिकणे, घोटणे आवश्यकच होते. तसा तो अँजेला यांनाही शिकावा लागला, पण त्यांची या विषयातील गती यथातथाच राहिली.

अँजेला यांना पहिल्यापासूनच गणिताची आवड होती. त्याच जोडीला शाळेत असताना त्या रशियनही शिकल्या. त्यांचे रशियन इतके उत्तम होते, की त्या सहजतेने रशियनमध्ये संवाद साधू शकत. लेखन, वाचनही करू शकत. परंतु, गणित व शास्त्राची गोडी त्यांना स्वस्थ बसू देत नव्हती. त्यामुळेच शालेय शिक्षण संपल्यावर त्यांनी अ‍ॅकॅडमी ऑफ सायन्सेसमध्ये प्रवेश घेतला. तेथे गणिताबरोबरच भौतिकशास्त्राचेही अध्ययन केले. याच काळात त्या एफडीजेच्या मध्यवर्ती समितीतही दाखल झाल्या. त्या काळात त्यांनी मार्क्सवादाचा प्रचार केल्याचे सांगितले जाते. तथापि, मर्केलबाईंनी ते साफ धुडकावून लावले आहे. मी पक्षाच्या सासंस्कृतिक खात्याचे काम बघत होते. रशियन साहित्यिक किंवा अभ्यागतांचे कार्यक्रम आयोजित करणे आणि ते पार पाडण्याचे काम मी त्या काळात करत होते, असे त्यांचे म्हणणे आहे. ते काहीही असो, पण त्यांना कम्युनिस्ट पक्षाचे काम करावे लागले, हे स्पष्ट आहे. हे शिक्षण संपल्यावर १९७३ मध्ये लिपझिगमधील कार्ल मार्क्स विद्यापीठात अँजेलाबाई उच्च शिक्षणासाठी दाखल झाल्या. १९७८ पर्यंत त्यांनी तेथे शिक्षण घेतले. भौतिकशास्त्रात त्यांनी पदवी मिळवली. या काळातही त्यांच्यातील नेतृत्वगुण प्रकर्षाने जाणवत राहिले. या विद्यापीठात पूर्वी विद्यार्थांचे एक सर्कल होते. ते पुढे बंद पडले होते. अँजेलबाईंनी पुढाकार घेऊन ते पुन्हा सुरू केले. कम्युनिस्ट पार्टी आणि सरकारचा रोष पत्करूनही त्यांनी हे सर्कल पुन्हा सुरू केले व विशेष म्हणजे पुढे हा रोष कमी होऊन त्याला मान्यताही मिळाली. विद्यापीठाची पदवी मिळाल्यानंतर लगेचच त्यांना एका अभियांत्रिकी विद्यालयात सहायक प्राध्यापकाची नोकरी चालून आली होती. त्यासाठी एक अट ठेवण्यात आली होती, ती म्हणजे विद्यालयातील शिक्षक, प्राध्यापकांवर पाळत ठेवून, त्यांची बित्तंबातमी पार्टीला द्यायची. मी असले काही करू शकत नाही आणि करणारही नाही, असे स्पष्ट सांगत अँजेला यांनी अशा गुप्तहेरगिरीला सरळ नकार देत नोकरीवर पाणी सोडले. विद्यापीठात शिकत असतानाच त्यांचा उलिच मर्केल या भौतिकशास्त्राच्या विद्यार्थ्याशी परिचय झाला आणि १९७७मध्ये, वयाच्या तेविसाव्या वर्षी त्यांनी उलिच मर्केल यांच्याशी विवाह केला. विवाहानंतर त्यांनी मर्केल आडनाव लावणे सुरू केले.

लिपझिगमधील शिक्षण संपल्यानंतर पुढे काय, हा प्रश्न होताच. याच दरम्यान त्यांचे लग्नही झाले होते. विद्यापीठातील शिक्षणानंतर पदव्युत्तर शिक्षणासाठी मर्केल यांनी थेट पूर्व बर्लिन गाठले. तेथे अ‍ॅकॅडेमी ऑफ सायन्सेसमध्ये सेंट्र इन्स्टिट्युट फऑर फिजिकल केमिस्ट्रीमध्ये त्यांनी प्रवेश घेतला आणि पदव्युत्तर शिक्षण सुरू केले. १९७८ ते १९९० या काळात त्यांनी पूर्व बर्लिनमध्ये शिक्षण आणि संशोधनातच रममाण होणे पसंत केले. क्वांटम केमिल्यास्ट्री या विषयात त्यांनी डॉक्टरेट संपदान केली असून, अनेक शोधनिबंधही प्रसिद्ध केले.

१९८६ मध्ये प्रथमच त्यांना पश्चिम जर्मनीत मुक्तपणे प्रवास करण्याची संधी मिळाली. १९८०चे दशक युरोपसाठीच खळबळीचे होते. सोव्हिएत महासंघात तत्कालीन अध्यक्ष मिखाईल गोर्बाचेव्ह यांनी सुधारणांचा कार्यक्रम हाती घेतला होता. ग्लासनोस्त आणि पेरेस्त्रोईकामुळे रशियन समाज ढवळून निघत होता आणि त्याचे पडसाद शेजारच्या पूर्व युरोपात उमटू लागले होते. पोलंडमध्ये लेक वालेसा यांनी साम्यवादी राजवटीविरुद्ध संघर्ष सुरू केला होता. रूमानिया, हंगेरी, युगोस्लाव्हिया, चेकोस्लोव्हाकिया आदी देशांतही लोकशाहीसाठी संघर्ष सुरू झाला होता आणि पूर्व व पश्चिम जर्मनीतही हे वारे धडकले होते. पूर्व जर्मनीतील नागरिकांना मोकळा श्वास घ्यावा असे वाटत होते, तर देशाला दुभंगणारी प्रसिद्ध बर्लिन भिंत कधी एकदा पाडून टाकतो आहोत, असे पश्चिम जर्मनीतील नागरिकांना वाटत होते. या धामधुमीच्या काळात मर्केल सावध व सतर्कपणे सगळे पाहत होत्या. सोव्हिएत महासंघापाठोपाठ पूर्व जर्मनीतील एकापाठोपाठ एक साम्यवादी राजवटी कोसळत गेल्या आणि १९८९मध्ये बर्लिनची भिंतही पाडली गेली. त्यावेळी मर्केल बर्लिनमध्येच होत्या, पण त्या या विजयी मिरवणुकांत सहभागी झाल्या नव्हत्या. उलट त्यानंतरच्या राजकीय घडामोडींकडे त्यांचे लक्ष होते. त्यावेळी पूर्व जर्मनीत डेमॉक्रॅटिक अवेकनिंग हा नवा पक्ष स्थापन झाला आणि लगेचच त्या पक्षात मर्केल सक्रिय झाल्या. त्यांच्या जीवनाला कलाटणी देणारी ही घटना होती. १९९० मध्ये दोन्ही जर्मनींच्या एकत्रीकरणाचे वारे वाहत होते. हे एकत्रीकरण कसे करायचे, याच्या वाटाघाटी चालू होत्या. त्याच काळात १९९० मध्ये पूर्व जर्मनीत प्रथमच बहुपक्षीय निवडणुका झाल्या लोथार दे माईयेरे यांचे हंगामी सरकार सत्तेवर आले आणि या सरकारमध्ये प्रवक्त्या म्हणून मर्केल काम पाहू लागल्या. मर्केल यांचे वाक्चातुर्य, हजरजबाबीपणा आणि स्पष्टवक्तेपणा लोथार यांच्या नजरेतून सुटला नाही. त्यांनी मर्केल यांना अधिक कामाची संधी दिली. त्या काळात वोल्फगांग श्नूर हा सत्तारूढ पक्षाचा सदस्य पोलिसांसाठी हेरगिरी करत असल्याचे प्रकरण उघडकीस आले आणि लोथार यांच्या सरकारला त्याचे चटके बसू लागले. या प्रकरणात मर्केल यांनी ज्या चातुर्याने व सहजतेने सरकारची बाजू लावून धरली, त्यामुळे पूर्व जर्मनीतील सर्वच पक्षांच्या नेत्यांचे लक्ष प्रथमच मर्केल यांच्याकडे वेधले गेले. पुढे पूर्व जर्मनीतील सत्तारूढ डेमॉक्रॅटिक अलायन्स पक्ष ख्रिश्चन डेमॉक्रॅटिक युनियन (सीडीयू) पक्षात समाविष्ट झाला आणि जर्मनीच्या एकत्रीकरणानंतर हा पक्ष पश्चिम जर्मनीतील सीडीयूत समाविष्ट झाला.

जर्मनीच्या एकत्रीकरणानंतर १९९० मध्ये जर्मन संसदेसाठी (बुंडेनस्टाग) निवडणूक झाली. त्यात वयाच्या अवघ्या छत्तीसाव्या वर्षी मर्केल स्ट्रालसुंड मतदारसंघातून प्रथमच उभ्या राहिल्या आणि विजयीही झाल्या. सीडीयूचे तगडे नेते आणि जर्मनीचे चॅन्सलर हेल्मुट कोल यांनी संसदेवर प्रथमच निवडून आलेल्या तरुण मर्केलना मंत्रिमंडळात स्थान दिले. अनेकांसाठी हा धक्काच होता. त्यावेळी त्यांच्याकडे महिला व युवक कल्याण खात्याची जबाबदारी देण्यात आली होती. केंद्रीय राजकारणात नवख्या असलेल्या मर्केलनी कोल यांचे शिष्यत्व पत्करत जोरदार घोडदौड सुरू केली. १९९४मध्ये कोल यांनी

पुन्हा चँन्सलर म्हणून सत्ता ग्रहण केल्यानंतर त्यांनी मर्केल यांच्याकडे पर्यावरण आणि आण्विक सुरक्षा या महत्त्वाच्या खात्यांची जबाबदारी दिली. कोल तर मर्केल यांना मुलगीच मानत. मर्केल यांना मिळालेली ही पदोन्नतीही अनेकांच्या भुवया उंचावणारी होती. स्वत: संशोधक असल्याने मर्केल यांना या खात्याची जबाबदारी संभाळणे फारसे अवघड गेले नाही. चोख काम, अखंड सावधानता आणि कोल यांचा पाठिंबा, यांमुळे पक्षात व सरकारमध्येही मर्केल यांचे स्थान अबाधित होत गेले.

जर्मनीत १९९८ मध्ये झालेल्या सार्वत्रिक निवडणुकीत कोल यांच्या सीडीयू पक्षाचा पराभव झाला. जर्मनीचे सलग चार वेळा सारथ्य करणारे तगडे नेते कोल या पराभवामुळे काहीसे खचून गेले होते. या पराभवामुळे सीडीयूच्या नेतृत्वात बदलाची मागणी पुढे आली. त्यावेळी अनेक नेत्यांनी प्रयत्न केले खरे, पण शेवटी मर्केल यांचीच पक्षाच्या सरचिटणीसपदी निवड झाली. कोल यांच्यसारखेच मातब्बर असलेले नेते वोल्फगांग शौबेल यांनी मर्केल यांच्यापुढे आव्हान उभे केले, पण ते फार काळ टिकू शकले नाही. १९९९ मध्ये झालेल्या सात राज्यांच्या निवडणुकीत सीडीयूला उत्तम यश मर्केल यांनी मिळवून दिले होते. सातपैकी सहा राज्यांत सीडीयू पहिल्या क्रमांकाचा पक्ष बनला होता. त्याच दरम्यान पक्षनिधीचे एक प्रकरण उपटले. त्यात कोल व शौबेल यांनी काही गैरव्यवहार केल्याचे आरोप होऊ लागले होते. या प्रकरमाची चौकशीही सुरू झाली. हा प्रसंग बाका होता आणि तिथेच खरी मर्केल यांच्या नेतृत्वाची कसोची लागणार होती. परंतु, मर्केल डगमगल्या नाहीत. ज्याला आपण गुरू मानून राजकारणात धडे गिरवले, ते कोल आणि शौबेल यांची जाहीर निर्भत्सना मर्केल यांनी केली. या प्रकरणानंतर कोल व शौबेल यांचे नेतृत्व अस्तंगत झाल्यातच जमा होते. त्यामुळे १० एप्रिल २००० रोजी त्यांची पक्षाच्या सरचिटणीसपदी निवड झाली.

मर्केल यांची झालेली ही निवडही सर्वांना आश्चर्याचा धक्का देणारी होती. त्याची कारणे मात्र काहीशी वेगळी होती. एकतर सीडीयू हा कट्टर कॅथॉलिक विचारसरणीचा पुरस्कर्ता पक्ष होता आणि पश्चिम व दक्षिण जर्मनीत (बव्हेरिया वगैरे प्रांत) या पक्षाची पाळेमुळे रुजली होती. तसेच, या पक्षावर प्रथमपासून पुरुषांचाच वरचष्मा राहिला होता. त्या उलट मर्केल उत्तर व पूर्व जर्मनीचे नेतृत्व करणाऱ्या आणि प्रॉटेस्टंट पंथाचा पुरस्कार करणाऱ्या होत्या. हा फरक फारच महत्त्वाचा होता. तसेच, पुरुषी वर्चस्व मोडून काढण्याची त्यांची मानसिकताही त्यातून दिसून येत होती. तसेच, त्यांचे अर्थविषयक विचारही पक्षाच्या विचारांपेक्षा काहीसे वेगळे व आक्रमक होते. त्यामुळे आता त्या पक्षाचे तारू कसे पुढे नेणार, असा प्रश्न उपस्थित केला जात होता. पण पक्षाची नव्याने उभारणी करू या, असे सांगत बाई उत्साहाने कामालाही लागल्या. त्यातून सीडीयूत पुन्हा जान आली. नवे नेते, नवे विचार पक्षात आले. जर्मनीचे राजकारण असे वेगळ्या टप्प्यावर आले असताना बाह्य जगातही काही घडामोडी घडत होत्या. इराकचे सर्वे सर्वा सद्दाम हुसेन यांनी कुवेतवर आक्रमण केल्याने पश्चिम आशिया अशांत बनला होता. अमेरिकेने कुवेतच्या बाजुने या संघर्षात भाग घेत सद्दाम यांच्याविरुद्ध युद्ध पुकारले होते.युरोपातील ब्रिटन व अन्य काही देशांनी अमेरिकेची बाजू उचलून धरल्याने जर्मनी कोणता निर्णय घेणार याकडे युरोपचे लक्ष लागले होते. जर्मनीचे तत्कालीन चँन्सलर गेरहार्ड श्रोडर यांनी अमेरिकेला पाठिंबा द्यायची घोषमा केली खरी, पण संसदेतील विरोधी पक्ष असलेला सीडीयू याबाबत कोणती भूमिका घेणार, याची श्रोडर यांनाच कल्पना नव्हती. तेव्हा सीडीयूचे नेते फ्रिड्रिश मेर्झ यांच्याकडे सर्वांचे लक्ष लागले होते. पण मेर्झ यांच्याबरोबरच मर्केल यांनीही श्रोडर यांच्या भूमिकेला पाठिंबा जाहीर केला. याच इराक युद्धाच्या पार्श्वभूमीवर जर्मनीत २००१ मध्ये पुन्हा संसदेच्या निवडणुकीचे वारे वाहू लागले आणि फ्रिड्रिश मेर्झ व सीडीयूचा सहयोगी पक्ष असलेल्या सीएसयू पक्षाचे नेते एडमंड स्टोईबर यांनी चँन्सलर पदासाठी खटपट सुरू केली. मर्केल यांची ही महत्वाकांक्षा लपून राहिलेली नव्हती. त्यामुळेच मेर्झ यांच्या घोषणेमुळे त्यांची निराशा झाली. मर्केल यांना जनतेचा पाठिंबा असला, तरी पक्षात पुरेसा पाठिंबा नव्हता. म्हणूनच त्यांनी सावधपणे परिस्थिती हाताळण्यावर भर दिला. पुढे मेर्झ आणि स्टोईबर निवडणुकीत पराभूत झाले. सीडीयू पक्षालाही सत्तेत सहभागाची संधी मिळाली नाही. मात्र, मेर्झ यांच्या जागी संसदेतील विरोधी पक्षनेता म्हणून मर्केल यांची निवड झाली. एखाद्या जर्मन महिलेला मिळालेला हा सर्वात मोठा सन्मान होता. त्या वेळेपर्यंत कोणतीही जर्मन राजकारणी महिला या पदापर्यंत पोहोचली नव्हती. त्यामुळेच मर्केल यांची ही नियुक्ती चर्चेचा विषय ठरली.

विरोधी पक्षनेत्या म्हणूनही त्यांची कारकीर्द लक्षणीय ठरली. जर्मनीच्या विकासाचा व अर्थकारणाचा वेग वाढवायचा असेल, जर्मनीला आर्थिक सुधारणांची कास धरावी लागेल. त्यासाठी कामगार कायद्यांत मोठ्या प्रमाणावर बदल करावे लागतील, सार्वजनिक, सामाजिक प्राधान्यक्रमांत बदल स्वीकारावे लागतील, असे त्यांचे म्हणणे होते, आणि ते त्या संसदेत व बाहेरही हिरिरीने मांडत होत्या. अमेरिकेबरोबर अधिक घनिष्ट संबंध प्रस्थापित करण्यावरही त्यांनी भर दिला होता. मात्र, प्रारंभी इराक युद्धात अमेरिकेला पाठिंबा देणाऱे चँन्सलर श्रोडर यांनी २००३ नंतर आपल्या भूमिकेत बदल केला. त्यांनी अमेरिकेच्या विरोधात भूमिका घेतली. युरोपीय समुदायात सहभागासाठी तुर्कस्तान दीर्घकाळ प्रयत्न करत आहे. तुर्कस्तानच्या या मागणीलाही श्रोडर यांनी अनुकुलता दर्शवली. श्रोडर सरकारच्या या धोऱणबदलांचे पडसाद जर्मन समाजात उमटत होते. विशेषत: तुर्कस्तानला युरोपीय समुदायात सहभागी करून घेण्यास सर्वसामान्य जर्मन नागरिकांचा विरोध होता. याच मुद्द्यावर मर्केल यांनी श्रोडर सरकारला घेरले. याशिवाय सरकारच्या अन्य आर्थिक धोरणांचेही मर्केल यांनी वाभाडे काढले. २००५च्या सार्वत्रिक निवडणुकीत आर्थिक धोरणे हाच प्रचाराचा केंद्रबिंदू ठरला. मात्र, एका चर्चेत मर्केल काहीशा गडबडल्याने त्यांचे मताधिक्य घटले. हा गोंधळ लक्षात येताच त्यांनी पॉल किरचॉफ या अर्थतज्ज्ञास अर्थमंत्री म्हणून नियुक्त करण्याची घोषणा केली. या किरचॉफनी अकसमान कराची संकल्पना मांडली. त्याला विरोध होत असल्याचे लक्षात येताच मर्केल यांनी या धोरमांपासून बाजूला राहणे

पसंत केले. या निवडणुकीत मर्केल यांचा सीडीयू व सहयोगी पक्ष असलेल्या सीएसयू पक्षास ३५.२ टक्के, तर श्रोडर यांच्या एसपीडी पक्षास ३४.२ टक्के मते मिळाली. फ्री डेमॉक्रॅटिक पार्टी या पक्षासही संसदेत लक्षणीय जागा मिळाल्या. कोणताही एक पक्ष सरकार स्थापन करू शकणार नाही, हे लक्षात येताच महाआघाडीचे सरकार स्थापन करण्याच्या हालचाली सुरू झाल्या आणि सीडीयू ल एसपीडी या पक्षांत चॅन्सलर पद कोणाकडे यावरून  वाद सुरू झाले. परंतु, चॅन्सलरपदाची महत्त्वाकांक्षा असलेल्या मर्केल यांनी सर्व दबाव झुगारून देत हे पद पदरात पाडून घेतले. त्याबदल्यात सोळापैकी आठ मंत्रिपदे त्यांनी एसपीडी पक्षास दिली. २२ नोव्हेंबर २००५ रोजी चॅन्सलरपदाची सूत्रे स्वीकारत मर्केल यांनी इतिहास घडवला. पुरुषप्रधान राजकारणात स्वत: चे स्थान सिद्ध केलेल्या मर्केल यांच्या रुपाने जर्मनीत प्रथमच एक महिला इतक्या उच्चपदी विराजमान झाली.

मर्केल यांची ही कारकीर्दही वादळी ठरली. २००५ नंतर सलग चार वेळा त्या जर्मनीच्या चॅन्सलरपदी निवडून आल्या आहेत. अमेरिकी सबप्राईम गैरव्यवहाराचे प्रकरण उघडकीस आल्यानंतर आलेल्या जागतिक मंदीचा फटका युरोपातील सर्वच देशांना बसला. ग्रीस जवळपास कंगाल बनला, तर इटली, स्पेन, पोर्तुगालसह अन्य अनेक देशांच्या अर्थव्यवस्था आजही दोलायमान आहेत. या मंदीतही मर्केल यांच्या नेतृत्वाखाली जर्मनीची अर्थव्यवस्था सातत्याने सुधारतीच राहिली. या मदीने युरोपीय महासंघापुढे अनेक आव्हाने उभी केली. ग्रीसने या संघटनेबाहेर पडण्याचा इशारा दिला. ग्रीसपाठोपाठ अन्यही काही देश त्याच वाटेने जाण्याचा धोका होता. मर्केल यांनी हा पेच खंबीरपणे हाताळला. युरोचे भवितव्य काय, हा प्रश्नही त्या काळात उपस्थित केला जात होता. अमेरिकी डॉलरच्या तुलनेत युरोचा विनिमय दर स्थिर राखत त्यालाही त्यांनी चोख उत्तर दिले. ब्रेग्झिट असो, की स्पेनमधील कॅटॅलोनिया प्रांतातील स्वातंत्र्याचा संघर्ष असो, मर्केल यांनी युरोपीय महासंघाचे हित डोल्यासमोर ठेवूनच निर्णय घेतले. त्यामुळे युरोपच्या नेत्या म्हणून त्यांचे स्थान उत्तरोत्तर अबाधितच होत गेले.

सीरिया आणि उत्तर आफ्रिकी देशांतून युरोपात दाखल झालेल्या स्थलांतरितांचे करायचे काय, हा प्रश्न युरोपला आजही सोडवता आलेला नाही. अनेक देशांनी या स्थलांतरितांना देशाबाहेर काढण्याचा प्रयत्न चालवला आहे. परंतु, या आघाडीवरही मर्केल यांची भूमिका वेगळी आहे. सीरियातील संघर्ष व तेथील सामान्यांची होरपळ लक्षात घेऊन या स्थलांतरितांना जर्मनीने सामावून घ्यावे, असे सांगत त्यांनी तशी धोरणेही राबवली. त्यावर खुद्द जर्मनीत जोरदार विरोध होऊनही मर्केल यांनी आपल्या धोरणात बदल केलेला नाही. बर्लिन, म्युनिकमध्ये झालेल्या दहशतवादी हल्ल्यांनंतर मर्केल यांच्या या धोरणांची कसोटी लागली. स्थलांतरितांविरुद्ध मोठा क्षोभ उसळला. पण आजही मर्केल या विरोधाला बधलेल्या नाहीत, हेच त्यांचे वेगळेपण. गेल्या वर्षी जर्मनीत झालेल्या सार्वत्रिक निवडणुकीत आल्टरनेटिव्ह फऑर जर्मनी या पक्षाने मोठे आव्हान उभे केले. पुन्हा एकदा कडबोळे सरकार चालवण्याची वेळ मर्केल यांच्यावर आली. यावेळी तर त्यांचे पद जाणार की राहणार, असाच प्रश्न होता. पण स्थलांतरितांचा प्रश्न असो, की आर्थिक धोरणे, त्याला मर्केल यांनी मुरड घातलेली नाही.

अमेरिकेचे माजी अध्यक्ष जॉर्ज बुश व बराक ओबामा यांच्याबरोबर त्यांचे उत्तम संबंध होते. जागतिक राजकारणाविषयी हे नेते मर्केल यांच्याशी सहजतेने संवाद साधत. तिकडे रशियाचे अध्यक्ष व्लादिमिर पुतिन यांच्याशीही मर्केल यांनी सलोख्याचे संबंध राखले आहेत. युक्रेन प्रकरणात त्यांनी युक्रेनची बाजू उचलून धरताना पुतिन यांना चार खडे बोल सुनावण्यासही त्यांनी मागेपुढे पाहिलेले नाही. तसेच, पुढे रशियाबरोबर वायू व उर्जा क्षेत्रातील करार करतानाच, रशियावर जर्मनी फार काळ अवलंबून राहू शकत नाही, हे ऐकवण्याचे धोडसही केवळ त्याच करू धजतात. अमेरिकेचे विद्यमान अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी जर्मनी व रशियाच्या या कराराराला आक्षेप घेताच, ट्रम्प यांनी या प्रकरणात नाक खूपसू नये, असे सांगम्याचे धैर्यही त्यांनी दाखवले आहे. दलाई लामांशी त्यांनी बर्लिनमध्ये मुक्त संवाद साधला. त्यावरून चीनने आदळआपट केली, पण त्याकडे त्यांनी खंबीरपणे दुर्लक्ष केले. पुढे चीनलाही जर्मनीची गरज भासू लागल्याने मर्केल यांनी चिनी अध्यक्ष जिनपिंग यांच्याशी सलोख्याचे संबंध राखण्यास प्राधान्य दिले. मर्केल यांचे आणकी एक वैशिष्ट्य नोंदवावेच लागेल. प्रगत देशांच्या जी ८ व जी २० अशा संघटना आहेत. २००५ पासून या संघटनांच्या परिषदेस सातत्याने उपस्थित राहणाऱ्या त्या एकमेव नेत्या आहेत. याकाळात या संघटनेतील देशांत अनेक नेते आले आणि गेले, पण मर्केल जही तेथे घट्ट पाय रोवून उभ्या आहेत. त्यामुळेच या संघटनेला आणि युरोपलाही त्यांच्याबद्दल आदर वाटतो. युरोप त्यांना आपल्या नेत्या मानतो, त्यामागे हेही एक कारण आहे.

तत्कालीन पूर्व जर्मनीत बालपण व तारुण्य व्यतित केलेल्या मर्केल सतत सावध असतात. कदाचित तत्कालीन साम्यवादी राजवटीतच त्यांची अशी मानसिक जडणघडण झाली असवा. त्या राजवटीत प्रत्येक नागरिकाला राजकीयदृष्ट्या सतत सावध व सतर्क (इंग्रजीत ज्याला पॉलिटिकली करेक्ट म्हणतात तसे) राहावे लागत असे. हाच सावधपणा, हीच सतर्कता त्यांनी आयुष्याच्या या टप्प्यावरही बाळगल्यानेच देशांतर्गत असो, की आंतरराष्ट्रीय, या रोजकारणात त्या नेहमीच पॉलिटिकली करेक्ट ठरत आल्या आहेत.

राजकारणात इतक्या उच्चपदाला गेलेल्या मर्केल यांनी आपले खासगी आयुष्य खासगीच राहील, याची सातत्याने दक्षता घेतली आहे. उलिच मर्केल यांच्याशी त्यांनी १९८२ मध्ये घटस्फोट घेतला होता. त्यापूर्वीच वर्षभऱ आधी त्यांची जोआकिम सॉअर या संशोधक विद्यार्थ्याशी ओळख झाली होती. याच सॉअर यांच्याशी मर्केल यांनी ३० डिसेंबर १९९८ रोजी अतिशय साधेपणाने विवाह केला. जोआकिम क्वांटम केमिस्ट्री या विषयातले तज्ज्ञ मानले जातात आणि याच विषयाचे अध्यापन ते करतात. प्रसिद्धीपासून ते नेहमी दूर राहतात. मर्केल यांना एकही अपत्य नाही, पण जोआकिम यांना पहिल्या पत्नीपासून दोन मुले आहेत. तथापि, तीही प्रसिद्धीपासून दूर राहतात. मर्केल आजही पतीसह बर्लिनमधील साध्या फ्लॅटमध्येच राहतात. मर्केल यांचे लहान बंधू मार्कस कास्नेर फिजिसिस्ट असून, बहिण इरेन कास्नेर ऑक्युपेशनल थेरपिस्ट म्हणून काम पाहते.

# सासू- सुनेच्या भांडणात घरात आला सीसीटीव्ही




**लग्नाला काही काळ झाल्यानंतर नववधूचे सासू, नणंदा, जाऊ यांच्याशी वाद सुरू होतात. दोन्ही बाजूंनी ताठर भूमिका घेतल्यास संसार मोडण्याची शक्यता असते. राज्य महिला आयोगाच्या समुपदेशकांनी सुचविलेल्या एका साध्या उपायामुळे नितीन आणि संपदाचा संसार टिकून राहिला.**

## धनंजय बिजले

नितीन (मूळचे नाव बदलले आहे) आणि संपदा (मूळचे नाव बदलले आहे) यांच्या लग्नाला आता तीन वर्षे झाली होती. शहरातील मध्यवस्तीत त्यांचा दोन बेडरूमचा प्रशस्त फ्लॅट होता. आई-वडिलांचा नितीन एकुलता एक मुलगा. त्यामुळे त्यांना सांभाळण्याची सारी जबाबदारी नितीनवरच होती. त्यामुळे अर्थातच नितीनच्या लग्नानंतरही तेदेखील याच घरात राहत होते. म्हटलं तर तसे हे चौकोनी कुटंब. बरे फ्लॅट प्रशस्त असल्याने व त्याला चांगला मोठा टेरेस असल्याने चोघांना हे घर पुरायचे. त्यामुळे तसा फारसा प्रश्न नसायचा. नितीनचे वडील सेवानिवृत्त झाले होते, तर आई गृहिणीच होती. साठी ओलांडलेल्या दोघांची प्रकृती उत्तम होती. दोघांचाही नितीन लाडका. संपदावरही ते नितीनप्रमाणेच प्रेम करायचे. नितीनची आई घरातील कामात संपदाला मदत करायची. कधी सकाळचा चहा करायची, तर कधी संध्याकाळचा स्वयंपाक करायची. वडील बाहेरून दूध, किराणा माल, भाजी खरेदी करून आणायचे. शिवाय दोघेही सकाळ-सायंकाळ फिरायला जायचे. जेणेकरून व्यायामही होईल व संपदालाही स्पेस मिळेल. थोडक्यात, घरातील वातावरण तसं बऱ्यापैकी आनंदी होते.

तसं पाहिल्यास नितीन व संपदा सुशिक्षित घरातील. दोघेही चांगले शिकलेले. त्यांचा विवाह नेहमीच्या रितीरिवाजानुसार झालेला. नितीन एका चांगल्या खासगी कंपनीत नोकरीला होता. संपदा मात्र नोकरी करत नव्हती. ती घरातच असायची. नितीनला अनेकदा नोकरीच्या कामानिमित्त बाहेरगावी जावे लागायचे. अर्थात, दोन दिवसांपेक्षा जास्त काळ तो कधीच घराबाहेर नसायचा. त्यामुळे संपदाचीही काही तक्रार नसायची. शिवाय घरात संपदाच्या सोबतीला आई-वडील असल्याने नितीनही निर्धास्त असायचा. त्यामुळे संपदाची त्याला काळजी नसायची, तसेच संपदा घरातच असल्याने आई-बाबांचाही घोर त्याला नसायचा. त्यामुळे कामात त्याचे लक्ष चांगले

लागायचे.

संपदालाही नोकरी करण्याची फारशी इच्छा नव्हती, तसेच सासू-सासरे व नितीनचाही तसा आग्रह नव्हता. आणि सांपत्तिक स्थिती बऱ्यापैकी असल्याने संपदाने नोकरी केलीच पाहिजे, अशातला भागही नव्हता. नाही तर सध्याच्या काळात शहरात रहायचे म्हटले की एकट्याच्या पगारात घर चालणे मुश्कील होते. त्यामुळे अनेकदा महिलेला अनिच्छेनेही नोकरी करणे भाग पडते. कारण, शहरातील खर्चच फार असतात. त्यात घर विकत घ्यायचे, मोटार घ्यायची तसेच दैनंदिन घरखर्च भागवायचा म्हटले की सध्याच्या महागाईच्या काळात फार पैसे लागतात. पण इथे असा काही प्रश्न नव्हता. नितीनच्या आई-बाबांनी घर खरेदी केले होते. पुढचा विचार करूनच त्यांनी चार खोल्यांचे प्रशस्त घर विकत घेतले होते. त्यामुळे नितीनला वेगळे घर खरेदी करण्याची गरज नव्हती. त्यामुळे त्याच्या डोक्यावरचा फार मोठा भार हलका झाला होताच.

संपदाला तिचे सासू-सासरे तिच्याकडेच राहणार आहेत, याची कल्पना लग्नापूर्वीच होती. तसे नितीनने तिला आधीच सांगितले होते. त्याची संपदाला सुरुवातीला काही हरकत नव्हती. कारण तीदेखील मध्यमवर्गीय कुटुंबातूनच आलेली होती. त्यामुळे तिने फारशी खळखळ केली नाही. लग्नानंतरचे पहिले वर्ष तर कसे आनंदात निघून गेले, हे तिलाही कळले नाही. सासू-सासरे, नवरा सारेच तिची काळजी घ्यायचे. तिच्या स्वयंपाकाचे कौतुक करायचे, तिच्या आवडी-निवडी जपायचे. त्यामुळे संपदाला माहेरून सासरी आल्याचे तसे वेगळे काही वाटलेच नाही. तीदेखील नितीनप्रमाणेच सासू-सासऱ्यांची काळजी घ्यायची. पहिली दोन वर्षे तशी छान गेली. पण नंतर मात्र हळू हळू किरकिरी सुरू झाल्या.

संपदाच्या आता तक्रारी सुरू झाल्या. विशेषतः सासूवर ती जामच नाराज होऊ लागली. आता तिला सासू-सासरे म्हणजे जाच वाटू लागले. खरे तर तसा तिला त्यांचा काही त्रास नव्हता. दोघेही मितभाषी होते. त्यांची प्रकृती चांगली होती. त्यामुळे त्यांचे आजारपण वगैरे असला काही प्रश्न नव्हता. शिवाय ते फारसे रागीट किंवा अतिशिस्तीचे आहेत अशातलाही काही भाग नव्हता. त्यामुळे तिला ते कधी रागावण्याचाही प्रश्न नव्हता. बरे ते संपदाला कधी बाहेर गेली, मैत्रिणीबरोबर फिरायला गेली, माहेरी गेली तर कधी बोलायचे असेही काही नव्हते. त्यामुळे संपदाने तक्रार करावी अशातला काही भाग नव्हता. उलट सासूबाई तर संपदाला घरकामात मदत करायच्या. आपल्याला मुलगी नाही त्यामुळे त्या संपदाला मुलगीच मानून तिचे लाड करायच्या.

पण म्हणतात ना... कधी कधी आपलेच सुख आपल्यालाच डाचू लागते अशातला भाग झाला होता. कधी कधी दुसऱ्याची नजर लागण्यापेक्षा आपल्या संसाराला आपलीच नजर लागते, अशी एक म्हण आहे. संपदाची परिस्थिती अशातलीच झाली होती, असे म्हणायला हरकत नाही. तिला सारे कळत होते, पण वळत नव्हते. त्यामुळे ती आता सासूविरुद्ध सतत तक्रार करू लागली. नितीन कामावरून



घरी आला रे आला की तिची भुणभुण सुरू व्हायची. नितीन घरी येताच संपदा त्याला सासूविषयी कांगाळ्या सांगायला सुरू करायची. बरं तक्रारी कोणत्याही स्वरूपाच्या असायच्या. त्याला काही अर्थच नसायचा. आज भाजीत मीठच घातले नाही, चहात साखरच मुद्दात कमी घातली. सुरुवातीला नितीन अशा तक्रारी हसून सोडून द्यायचा. तिला म्हणायचा, ''अगं, मग तू चहा कर. आईला चहा करू देऊ नको. हवं तर तसं मी सांगते तिला.''

नंतर नंतर तक्रारींचे स्वरूप बदलू लागले. सासूबाई मला टिव्ही बघू देत नाहीत, आज फोनवरच जास्त बोलत होत्या, तर कधी आज दिवसभर टीव्हीच पहात बसल्या त्यामुळे माझे डोके दुखायला लागले आहे. संपदाच्या या रोजच्या तक्रारींमुळे नितीन खरं तर वैतागून जात असे. पण तरीही तो समंजस असल्याने संपदाचे म्हणणे शांतपणे ऐकून घेत असे. तिला समजावून सांगे. अरे आई-बाबा आता वयस्कर झाले आहेत. त्यांच्या प्रत्येक गोष्टीकडे तू लक्ष देत जाऊ नको. ते तुला काही बोलले का, नाही ना... मग कशाला त्रास करून घेते, अशा लहानसहान बाबींमुळे तुलाच त्रास होतो. त्यामुळे सोडून दे असे तो संपदाला समजावून सांगे. संपदा तेवढ्यापुरती मान डोलवायची. पुन्हा पहिले पाढे

पंचावन्न. दुसरा दिवस उजाडला... नितीन घरी आला की पुन्हा तक्रारी सुरू.

दिवसभर काम करून घरी आले की बायकोची भुणभुण. यामुळे नितीन आता चिडू लागला होता. बरे आता संपदा केवळ त्याच्याकडेच तक्रारी करायची अशातला भाग नव्हता. आता लग्नाला तीन-एक वर्षे झाल्याने तीदेखील सरावली होती. आता ती सासूला उलटे बोलू लागू लागली होती. छोट्या-छोट्या गोष्टींवरून चिडू लागली होती. आधी ती नितीनकडेच तक्रारी करायची. पण आता ती काही पटले नाही का सासूला फाडकन उलटे बोलायची. घर म्हटले की भांड्याला भांडे लागणारच, असे मानून सासूबाई शांत राहायच्या. पण आता संपदाचे बोलणे जरा वाढलेच होते. क्षुल्लक कारणावरून ती आता सतत पाणउतारा करू लागली होती. सकाळी उठल्यापासून हे सुरू व्हायचे. नितीन घराबाहेर पडला की संपदाच्या जिभेला धार चढायची. सुरुवातीला जाऊ दे म्हणून सोडून देणाऱ्या सासूबाईंना आता पाणी डोक्यावरून जातेय हे लक्षात येऊ लागले होते. त्यामुळे त्यादेखील आता संपदाच्या अरे ला कारे करू लागल्या.

त्यामुळे घरात भांडणे ही आता नित्याचीच बाब होऊ लागली. पण यात अनेकदा संपदाच चुकीची असायची. पण तिला हे समजत नव्हते. आईप्रमाणे वागणाऱ्या सासूला तिने सासू बनायला भाग पाडले होते. सुरुवातील त्या गप्प बसायच्या. नितीनला काही सांगायच्या नाहीत. पण संपदा आता भलतेसलते आळ घेऊ लागली म्हटल्यावर त्यांनीही ही बाब नितीनच्या कानावर घालायची असे ठरविले. उगाच मुलाला कामाचा ताण असतो, त्यात आपली भर कशाला, असे मानून त्या इतके दिवस गप्प होत्या. पण आता जास्तच झाल्याने त्याही नितीन घरी आल्यावर त्याच्याकडे तक्रारी करू लागल्या. त्यामुळे काम ावरून घरी यायचे म्हटले तरी नितीनच्या अंगावर काटा येऊ लागला.

नितीन घरी आला की संपदा सासूसमोरच तक्रारीचा पाढा वाचायला सुरू करायची. त्याला नितीनची आई प्रत्युत्तर द्यायची. त्यामुळे घराचे घरपणच जवळजवळ संपायला लागले होते. भांडणे, किटकिटी रोजच्याच झाल्या होत्या. एकेकाळी हसण्या खिदळण्याचे आवाज येणाऱ्या या घरातून आता एकमेकांवर ओरडण्याचे, रागावण्याचे आवाज कानी पडू लागले होते. नितीनची यातून चांगलीच घुसमट होऊ लागली होती. एका बाजूला आई तर दुसऱ्या बाजूला बायको, असा दुहेरी कात्रीत तो सापडला होता. दोंघीपैकी एकीलाही तो सोडू शकत नव्हता. दोघींचीही जबाबदारी त्याच्यावरच तर होती. त्यामुळे रोज या दोघींमधील भांडणे सोडवायची, हे त्याचे कामच झाले होते. कधी तो आईची बाजू घ्यायचा, तर कधी बायकोची. यातून पुन्हा नवाच वाद पेटायचा. यातून त्याची मनःस्थिती पुरती बिघडत चालली होती. सुरुवातील शांत असणाऱ्या सासूबाई आता शांत बसायचे नावच घ्यायच्या नाहीत. त्यामुळे प्रश्न कमी होण्याऐवजी वाढतच होता. पण तरीही संपदापेक्षा त्या कमी आक्रस्ताळ्या होत्या. त्याहीपेक्षा त्यांची सहन करण्याची क्षमताच जणू संपत चालली होती. सून आपल्याच घरात आपल्याला सतत बोलते, हे त्यांना आता सहनच होत नव्हते. मुलाला हे सांगून त्रास होतोय हे कळूनही त्या आता स्वतःला गप्प बसवू शकत नव्हत्या. त्यामुळे त्याही तक्रारी करायच्या.

रोजच्या कटकटींमुळे नितीनची मात्र सेसेहोलपट होत होती. आता तो या दोघांनाही काही सांगण्याच्या फंदातच पडत नसे. घरी येताच दोघींची भांडणे व तक्रारी ऐकून तो पुरता वैतागून गेला होता. त्यामुळे आता तो बायको किंवा आई काही सांगू लागली किंवा भांडू लागले की स्वतःला थोबाडीत मारून घेऊ लागला. स्वतःलाच त्रास करून घेऊ लागला. सुरुवातीला हे पाहून दोघीही वरमून शांत व्हायच्या. मात्र नंतर नंतर नितीनच्या या वागण्याचाही त्यांच्यावर काही फरक पडेनासा झाला. नितीन रोज स्वतःला गालात थोबाडीत मारून घ्यायचा, भिंतीवर डोके आपटायचा. पण सासू-सुनेची हमरीतुमरी सुरूच रहायची. आता तर नितीनने या परिस्थितीत हात टेकले होते. एक दिवस तो कामावरून घरी आला तर पाहतो तर काय संपदा बॅग भरून माहेरी निघून गेलेली.

खरं तर नितीनने हादरून जावे, असी ही स्थीती होती. पण त्याला काहीच वाटले नाही. घरातील शांतता पाहूननच तो मनातून सुखावला. जावू दे... काय व्हायचे ते होऊ दे, पण संपदाला फोन करायचा नाही की परत बोलवायचे नाही, असेच त्याने मनाशी ठरवले. आपण माहेरी आल्यावर नितीन लगेच फोन करेल, सुतासारखा सरळ होईल, आणाभाका करेल, असे संपदाला वाटले होते. पण तसे काहीच झाले नाही. नितीनने साधी चौकशीही केली नाही, याचा तिला धक्काच बसला. पण याला कारणीभूत ती स्वतःच होती, याचे जराही भान तिला नव्हते. माहेरी येऊन पंधरा दिवस उलटले तरी नितीनने संपर्क केला नाही म्हटल्यावर तिने थेट महिला आयोगाकडे तक्रार करायची ठरवली व आयोगाकडे पत्रातून भावना मांडल्या. खरं तर तिला वेगळे रहायचे होते की हे त्यातून स्पष्ट होत नव्हते, पण सासूबद्दल तिच्या फार क्षुल्लक स्वरूपाच्या तक्रारी होत्या. महिला आयोगाच्या अध्यक्षा विजयाताई रहाटकर यांच्या वाचण्यात ते पत्र येताच त्यांना परिस्थितीचा थोडाफार अंदाज आला. साध्या सोप्या बाबींवरून चांगले घर विस्कटण्याची शक्यता असल्याचे त्यांच्या लक्षात आले. त्यांनी मग सर्वांनाच आयोगाच्या कार्यालयात बोलावून समोरासमोरच प्रश्नांचा सोक्षमोक्ष लावण्याचे ठरविले.

आयोगाच्या कार्यालयातील बैठकीत नितीन, संपदा, सासू-सासरे सारेच गोळा झाले. खरं तर नितीनला आपल्यावर अशी काही वेळ इतक्या छोट्या गोष्टींमुळे येईल, असे कधी वाटलेच नव्हते. आयोगाच्या कार्यालयात झालेल्या बैठकीतही संपदा व तिच्या सासूने एकमेकांवर आरोप-प्रत्यारोपच सुरू केले. खरे तर त्यांच्या आरोपात फारसे गंभीर असे काही नव्हते. पण स्वभावातील दोष होते. त्यामुळे दोघींनीही चार पावले मागे घेतली असती तरी प्रश्न सुटला असता. पण तसे होत नव्हते. नितीन तर हताश झाला होता. बायको की आई, कोण खरे बोलतेय हेच त्याला समजेनासे झाले होते. खरं तर वेगळं राहण्याची भाषा संपदाने केली नव्हती. कारण, ते शक्य नाही हे तिला माहितीच होते. पण ती मागे हटण्यास तयार नव्हती.

यात मग नितीन म्हणाला की, जर असे असेल तर घरात सीसीटीव्हीचे कॅमेरे बसवा. मग मला नेमके कळेल कोण खरे बोलतेय. कोणाचे चुकतेय. म्हटलं तर ही भन्नाट कल्पना होती. पण त्यामुळे घरातील सारी प्रायव्हसीच धोक्यात येणार होती. सीसीटीव्ही कॅमेरे साधारणपणे सार्वजनिक ठिकाणी, रस्त्यांवर फार फार तर सोसायटीत लावतात. घरात कोणी सीसीटीव्ही कॅमेरा लावत नाही. पण सीसीटीव्ही लावाच, असे सासू म्हणू लागली, तर संपदा त्याला विरोध करू लागली. यावर मग नितीनचे मध्यममार्ग सुचवला. दिवाणखाना (हॉल) व स्वयंपाकघरात सीसीटीव्ही कॅमेरे लावायचे. दोन्ही बेडरूममध्ये लावायचे नाहीत. यामुळे मी घरात नसताना किचन व हॉलमध्ये तुमचे काय चालते, हे मला समजेल. हो-नाही करता करता याला संपदा अखेर तयार झाली. अशा रीतीने सासू-सुनेच्या भांडणात चक्क घरातच सीसीटीव्ही कॅमेरे आले. पण याचा परिणाम मात्र चांगला झाला. आपण जे काय बोलतोय, वागतोय हे कॅमेरा टिपतोय म्हटले की संपदाच्या वागण्यात कमालीचा मवाळपणा आला. सासूही शांत वागू लागली. कॅमेरा सारे काही टिपतोय, या कल्पनेनेच त्या दोघी आपली काही चूक होऊ नये, याची दक्षता घेऊ लागल्या. हळू हळू घरातील वातावरण नेहमीप्रमाणे सुरळीत होऊ लागले. घरात शांतता येऊ लागली. जे कोणाला शक्य झाले नाही, ते काम कॅमेऱ्यांनी करून दाखविले.

# इंदू मल्होत्रा : वकील ते थेट सर्वोच्च न्यायालयात न्यायमूर्ती





साद प्रतिनिधी

दिल्लीतील ज्येष्ठ विधिज्ञ इंदू मल्होत्रा या सर्वोच्च न्यायालयात थेट न्यायमूर्ती म्हणून नियुक्त होणाऱ्या पहिल्या महिला वकील ठरल्या आहेत. सर्वोच्च आणि उच्च न्यायालयांतील न्यायमूर्तींची निवड करणाऱ्या कॉलेजियमने मल्होत्रा यांच्या नावाची शिफारस केली होती. केंद्र सरकारने ती नुकतीच मंजूर केली.

### न्यायमूर्ती बनणाऱ्या सातव्या महिला

वकील ते थेट सर्वोच्च न्यायालयात न्यायमूर्ती बनणाऱ्या इंदू मल्होत्रा ह्या देशाच्या पहिल्या महिला वकील ठरल्या आहेत. सर्वोच्च न्यायालयाच्या न्यायमूर्ती बनणाऱ्या इंदू मल्होत्रा या सातव्या महिला आहेत. १९८९ मध्ये फातिमा बीबी या सर्वोच्च न्यायालयाच्या न्यायमूर्ती बनल्या. यानतंर सुजाता मनोहर, रूमा पाल, ज्ञान सुधा मिश्रा, रंजना देसाई आणि आर. भानुमती या सर्वोच्च न्यायालयाच्या न्यायमूर्ती बनल्या होत्या. सध्या सर्वोच्च न्यायालयाच्या २४ न्यायमूर्तींमध्ये आर. भानुमती या एकमेव महिला न्यायमूर्ती आहेत. आता ६१ वर्षीय इंदू मल्होत्राही त्यांच्या जोडीला असतील.

### सुप्रीम कोर्टातील ज्येष्ठ वकील बनणाऱ्या दुसऱ्या महिला

ऑगस्ट २००७ मध्ये इंदू मल्होत्रा यांना सर्वोच्च न्यायालयातील ज्येष्ठ वकील म्हणून मान्यता देण्यात आली. सुप्रीम कोर्टातील ज्येष्ठ वकील बनणाऱ्या त्या दुसऱ्या महिला आहेत. सुमारे तीस वर्षांपूर्वी म्हणजेच १९७७ मध्ये लीला सेठ सर्वोच्च न्यायालयातील ज्येष्ठ वकील बनल्या होत्या. उच्च न्यायालयाच्या पहिल्या मुख्य न्यायाधीश बनण्याचा मानही त्यांना मिळाला होता.

### कोण आहेत इंदू मल्होत्रा?

इंदू मल्होत्रा यांचा जन्म १९५६ साली बेंगळुरूमध्ये झाला. दिल्लीतील लेडी श्रीराम कॉलेज आणि दिल्ली विद्यापीठातून त्यांनी शिक्षण पूर्ण केले. त्यानंतर मल्होत्रा यांनी राज्यशास्त्र विषयात पदव्युत्तर शिक्षण घेतले.

दिल्ली विद्यापीठाच्या मिरांडा हाउस कॉलेज आणि विवेकानंद कॉलेजमध्ये त्यांनी प्राध्यापक म्हणून काम केलं. १९८३ मध्ये त्यांनी वकिली कारकीर्दीची सुरुवात केली.

त्यांचं संपूर्ण कुटुंबच वकिली करते. त्यांचे वडील ओ. पी. मल्होत्रा ज्येष्ठ वकील होते. त्यांचा मोठा भाऊ आणि बहिणही वकील आहे. त्याआधी त्यांनी दिल्ली विद्यापीठातून पदवी मिळवली. अनेक महत्त्वाच्या निकाल देणाऱ्या न्यायमूर्तींच्या खंडपीठातही त्यांचा समावेश होता.





# श्रीलंकेतील महिलाराजसाठी महाराष्ट्राकडून धडे

**भीम रासकर**
राज्य समिती सदस्य, महिला राजसत्ता आंदोलन

**स्थानिक स्वराज्य संस्थांच्या बळकटीसाठी श्रीलंकेतील अधिकाऱ्यांचे पथक एप्रिलमध्ये महाराष्ट्र दौऱ्यावर आले होते. मुंबई आणि कोल्हापूर येथे भेट देऊन या पथकाने माहिती घेतली. त्यांच्या दौऱ्याविषयी.**

कॉमनवेल्थ लोकल गव्हर्न्मेंट फोरम (सी.एल.जी.एफ.) हे नेटवर्क ५३ देशांतून काम करणाऱ्या स्थानिक संस्थांच्या संघटनांना मदत करीत आहे. स्थानिक स्वराज्य संस्था बळकट व्हाव्यात यासाठी श्रीलंकेतही असेच फेडरेशन कार्यरत आहे. या दोन्ही संस्थांच्या आग्रहाखातर महिला राजसत्ता आंदोलन व रिसोर्स ॲण्ड सपोर्ट सेंटर फॉर डेव्हलपमेंटच्या पथकासोबत अधिकाऱ्यांचे एक पथख महाराष्ट्र दौऱ्यावर आले व खूप उर्जा घेऊन गेला. महिला आरक्षणाचा महाराष्ट्राचा प्रभाव व स्थानिक स्व-शासनाचा स्वतःचा भाव या दोन्ही बाबी त्यांनी जाणून घेतल्या.

श्रीलंकेतील मुख्य सचिव हेरथ कुलरत्ने, मुख्यमंत्र्याच्या मुख्याधिकारी श्रीमती श्रीयानी पद्मलता यांच्यासमवेत स्थानिक स्वराज्य आयुक्त व उपायुक्त असे चार पुरुष अधिकारी व एक महिला अशा पथकाने आठवडाभर महाराष्ट्राचा दौरा केला. मुंबई व कोल्हापूर या दोन्ही भागांत त्यांनी एकूण दहा ठिकाणी भेटी दिल्या. सत्कार; भाषणे, प्रश्नोत्तरे, खसगी गप्पा व महिलांच्या अनुभवकथानांनी ते खूप समृद्ध झाले. जाताना नव-नव्या कल्पनांचा खजिनाही ते सोबत घेऊन गेले.

श्रीलंकेत महिलांनाही स्थानिक स्वराज्य संस्थांत २५ टक्के आरक्षण आहे,



**श्रीलंकेहून आलेल्या शिष्टमंडळातील सदस्यांना स्मृतिचिन्ह देताना राज्य महिला आयोगाच्या सदस्य सचिव डॉ. मंजूषा मोळवणे.**

परंतु त्यातही ६० टक्के जागा महिलांना पक्षांनी निवड करून द्यायच्या व ४० टक्के महिला खुल्या निवडणुकीला उभ्या राहू शकतात अशी तरतूद आहे. श्रीलंकेत साक्षर महिलांचे प्रमाण ९२.६ टक्के असूनही, त्यांना महिला उमेदवार सापडत नाहीत. फक्त घर सांभाळणे व छोटा-मोठा उद्योग व्यवसाय गरज भासली तरच करणे. यापलीकडे जाऊन त्या राजकारणाच्या वाट्याला जाऊ इच्छित नाहीत, असे तेथील चित्र आहे. ज्या देशाने जगाला पहिली महिला अध्यक्ष दिली; त्या देशात, महिलांना राजकारणात यायला त्रास होत आहे; राजकारणात आलेल्या महिलांचे चारित्र्यहनन केले जाते, अशा अनेक तक्रारी प्रसारमाध्यमांतून व्यक्त झाल्या, तरीही अनेक दशकानंतर कोलंबोला पहिली महिला महापौर लाभली हेही विशेष!

स्थानिक स्वराज्य अधिनियमातही श्रीलंकेने काही चांगले बदल केले आहेत. तेथे माहितीचा अधिकार मंजूर झाला आहे, ओ.जी.पी म्हणजे ओपन गव्हर्न्मेंट पार्टनरशिपही आहे. स्थानिक स्वराज्य संस्था निवडणूकांसाठी स्वतंत्र निवडणूक आयोग व बजेटही नुकतेच उपलब्ध झाले आहे; परंतु महिला आरक्षण व महिलांचा सहभाग वाढत नाही हे त्याचं दुखणे आहे.

त्या निमित्ताने हा महाराष्ट्र दौरा पाहुण्यांना काही मंत्र देऊन गेला. पहिल्याच दिवशी त्यांनी भारत व महाराष्ट्रातील महिला आरक्षणाची साक्ष पी.पी.टी. मांडणीतून समजून घेतली. ग्रामीण भागांतून आलेल्या महिला सरपंच व पंचांनी त्यांचे अनुभव पीपीटीद्वारे खणखणीतपणे मांडले. भाषेची अडचण असूनही भाषांतराद्वारे प्रश्नोत्तरे झाली. महिला नगरसेविका व शहरी कारभारणींच्या परिसंवादात तर वेळ कमी पडला. सर्व महिलांनी आपले अनुभव भरभरून सांगितले. खास करुन पक्षांनी महिला सन्मान कसा मनावर घेतला पाहिजे, यावर जास्त भर होता. पुरुषप्रधानता ही घरात, दारांत व पक्षातही कशी धिंगाणा घालतेय यावर महिला लोकप्रतिनिधींनी प्रकाश टाकला. अडचणींवर आम्ही कशी मात केली, याबाबतही शहरी व ग्रामीण कारभारणी भरभरुन बोलल्या. त्यांच्या राजकारणात येण्याने विकासक्रम बदलतोय, महिलांचे प्रश्न पुढे येतायत् व राजकीय संस्कृतीला हादरा बसतोय हे त्यांनी ठामपणे मांडलं. सावित्री अकादमी सारख्या भक्कम प्रशिक्षण संस्थेची गरजही त्यांना खूप वाटतेय. ग्रामसेवकराज व सरपंचपतीराज संपलेले नाही; गावात व शहरांत त्यांची रूपे वेगळी असली तरी संघटना व प्रशिक्षण दोन्हीही खूप गरजेचे असल्याचा त्यांचा खडा सूर होता. मात्र मागे हटायचे नाही, एक-एक संकटावर स्वार होत; राज्य करायला शिकायचेच हा निर्धार पक्का होता.

श्रीलंकन पाहुण्यांचा ताफा महाराष्ट्र निवडणूक आयोगालाही शांतपणे भेटून आला. महाराष्ट्रात निवडणूक आयोगाने घेतलेला पुढाकार यावर सविस्तर चर्चा झाली. खास करून विद्यापीठाच्या मार्फत युवा मतदार नोंदणी, गुन्हेगारी पार्श्वभूमीची अट व अनेक मतदार जागृती मोहिमांचे पाहुण्यांनी कौतुक केले.



**श्रीलंकेहून आलेल्या शिष्टमंडळातील सदस्यांना राज्य महिला आयोगाच्या सदस्य सचिव डॉ. मंजूषा मोळवणे यांनी आयोगाच्या कामकाजाविषयी माहिती दिली.**

माहिला आर्थिक विकास महामंडळाच्या (माविम) कामांमुळे श्रीलंकेचे पथक विशेष प्रभावित झाले. तो प्रयोग तेजस्विंनी प्रकल्पानुरूप श्रीलंकेतही राबवावा असे त्यांनाही जाणवले.

महाराष्ट्र राज्य महिला आयोगालाही त्यांनी विशेष भेट दिली. तेथील स्वागताने श्रीलंकन पाहुणे खूपच भारावून गेलेच. आयोगाच्या सदस्य सचिव डॉ. मंजूषा मोळवणे यांनी श्रीलंकेच्या अधिकाऱ्यांचे जोरदार स्वागत केले. माहिला आयोगाचा संपूर्ण कार्यालय परिसर, समुपदेशन केंद्र, महिला आयोगाकडे येणाऱ्या विविध केसेसचे नियमन कसे केले जाते याची माहिती देण्यात आली. महिला आयोगाने नव्यानेच सुरुवात केलेले सुहिता हेल्पलाइनचे प्रत्यक्षात केलेले प्रात्यक्षिकाने तर श्रीलंकन अधिकारी अधिकच भारावून गेले. एकंदरित, राज्य महिला आयोगाचे चाललेले काम प्रेझेटेंशनच्या माध्यमातून समजून घेऊन श्रीलंकेतही असेच महिलांसाठी स्वतंत्र आयोग गरजेचे आसल्याचे त्यांना वाटले.

यासोबतच कोल्हापूर जिल्हा दौरा त्यांना प्रचंड भावला. प्रशासनाचे भक्कम सहकार्य व ग्रामस्थांचे प्रेम यातही महिलांचा पुढाकार यामुळे ते आश्चर्यचकीत झाले होते. भाटणवाडीच्या ग्रामपंचायतीत महिला व ज्या सहजतेने वावरत होत्या, ज्या प्रेमाने त्यांनी पाहुण्यांची बैलगाडीतून मिरवूणक काढली, ज्या तऱ्हेने ते दूध संकलन केंद्र चालवतात-त्यांच्या ऊर्जेला तोडच नाही! भाटणवाडीने पाहुण्यांना महिला शक्तीचे अनोखे दर्शन घडवले.

कोल्हापूरचा कणेरी मठ म्हणजे ग्रामीण जीवनाचा जागता चित्रपट महोत्सव. संपूर्ण गाव कसे जगत होते, चालत होते व सन्मानाने उभे होतं याचा ऋआँखो देखा हाल' म्हणजे हे रुरल म्युझियम! कुणीही प्रेमात पडावं, असा हा देखावा. प्रत्यक्ष जुन्या गावात फेरफटका मारल्यासारखाच वाटतो!

माहिला आर्थिक विकास महामंडळाच्या (माविम) कोल्हापूरच्या सहयोगींचें पूर्ण पथक व स्वयंशासित तालुका केंद्रांनी तर कमालच केली. महिलांच्या व्यवस्थापनशास्त्राचे प्रत्यक्ष मॉडेल त्यांनी समोर उभे केले.

कोल्हापूर जिल्हा परिषदेचे अनोखे उपक्रम व त्याचा महिला सशक्तीकरणाचा पुढाकार संपूर्ण महाराष्ट्राला माहिती आहे. खास करुन स्त्री-पुरुष जन्मदर वाढावा यासाठी कोल्हापूर जिल्ह्याने विशेष कामगिरी केली आहे.

याच सोबत संपूर्ण गावाचा कारभार महिलांचाच हाती असलेली बुबनाळ ग्रामपंचायतही त्यांनी आवडीने पाहिली. तेथील पुरुषांचा पाठिंबां व गावाची प्रगती, ग्रामस्थांच्या तोंडून त्यांनी ऐकली.

एकूणच शहरी ग्रामीण शासकीय, स्वयंसेवी व स्थानिक प्रयत्नांची पाहुण्यांसमोर कमी वेळात मोठी शिदोरी ठेवली गेली. पाहुणे या धावपळीने थकले, पण महाराष्ट्राने त्यांचे मन जिंकले! इतके उच्चपदस्थ अधिकारी, भाषेची अडचण, शिष्टाचाराचा संभ्रम व संस्कृती भिन्नता असूनही शेवटच्या दिवशी त्यांचं भारावलेपण संपूर्ण महाराष्ट्राला व येथील स्त्री-शक्तीला सलाम करत होते.

महाराष्ट्राचा डंका श्रीलंकेच्या काळजात कसा घर करुन बसला हे त्यांनी चिंतन सत्रात भरभरुन मांडलं. महिला सबलीकरणाच्या पध्दती, पुस्तक, खेळ, प्रयोग व इथला उत्साह घेऊन ते जड अंतःकरणाने मायदेशी गेले. महाराष्ट्राचा डंका वाजवी श्रीलंका हे चित्र अजूनही मनासमोरुन जात नाही, हेच या दोऱ्याचे मोठ्ठं यश आहे.




# भारतीय महिलांचा 'राष्ट्रकुल'मध्ये दबदबा

**नुकत्याच पार पडलेल्या राष्ट्रकुल क्रीडा स्पर्धेत भारतीय महिलांचा दबदबा दिसून आला. मेरी कोम, साईना नेहवाल, तेजस्विनी सावंत या जुन्या चेहऱ्यांबरोबरच मनू भाकर, मनीषा बात्रा या नवोदितांची कामगिरीही लक्षवेधी होती. आता टोकियो ऑलिम्पिक हेच या खेळाडूंचे लक्ष्य असायला हवे.**

अमित मधुकर डोंगरे
amitdongre10@gmail.com

'म्हारी छोरीयाँ छोरोंसे कम है के'... हा दंगल चित्रपटातील संवाद राष्ट्रकुल क्रीडा स्पर्धेत भारतीय महिला क्रीडापटूंनी अक्षरशः सार्थ करून दाखवला. या स्पर्धेत भारताने जितकी पदके मिळवली त्यात महिलांनी मिळविलेल्या पदकांची टक्केवारी ऐंशीच्या जवळपास आहे. यातूनच हे सिद्ध झाले की पुरुष खेळाडूंपेक्षा महिला खेळाडू या स्पर्धेत सर्वात जास्त यशस्वी ठरल्या.

स्पर्धेची सुरुवातच दिमाखात करताना वेटलिफ्टिंग क्रीडाप्रकारात मीराबाई चानूने ४६ किलो वजनी गटात सुवर्णपदक पटकावले तर पुरुष गटात गुरुराजने रौप्यपदक पटकावले. स्पर्धेत दुसऱ्या दिवशी संजिता चानूने ५३ किलो गटात सुवर्णपदकाची कमाई केली. त्यानंतर पंचवीस वर्षीय सतीश शिवलिंगम आणि केवळ एकवीस वर्षांच्या वेंकट राहुलने सुवर्णपदके पटकावत वेटलिफ्टिंगमधील भारताचे वर्चस्व कायम राखले.

// स्त्रीशक्तिरतुल्या सदा //

स्पर्धा सुरू झाल्यानंतरचा पहिलाच रविवार भारतासाठी 'सुपर संडे' ठरला. सिंगापूरच्या टेबल टेनिसमधील वर्चस्वाला मोडीत काढत भारतीय महिला संघाने सुवर्णपदक जिंकले. या व्यतिरिक्त भारताची सोळा वर्षीय नेमबाज मनू भाकर हिने आपल्यापेक्षा खेळाडू व देशभगिनी हिना सिद्धू हिच्यापेक्षा सरस कामगिरी करत नेमबाजीतील पहिले सुवर्णपदक मिळवून दिले. त्याचवेळी वेटलिफ्टिंगमधील दबदबा कायम राखताना पूनम यादवने सुवर्णपदकाची कमाई केली. त्याच दिवशी रवीकुमारने दहा मीटर एअर रायफल नेमबाजीत ब्राँझपदक मिळवले. विकास यादवनेही पदक तालिकेत भर घालताना वेटलिफ्टिंगमध्ये ब्राँझ पदकाची नोंद केली. मनू भाकरच्या सुवर्णाला एक यशाची किनारही लाभली तिने हिना सिद्धूला रौप्य पदकावर समाधान मानायला लावले इतकेच नव्हे तर या एका महिन्यात आंतरराष्ट्रीय स्तरावरील विविध स्पर्धे त मिळून हे तिचे सातवे सुवर्णपदक ठरले.

बॅडमिंटन स्पर्धेची सुरुवातही भारताने दणदणीत केली मिश्र सांघिक गटात सुवर्णपदक जिंकले. यावेळी स्टार खेळाडू सायना नेहवाल आणि पी. व्ही. सिंधू यांनी दुहेरीत न खेळताही भारताने हे यश मिळवले हे सर्वात महत्त्वाचे. त्याच दिवशी नेमबाजीत जितू रायने दहा मीटर एअर पिस्तुलमध्ये सुवर्ण तर ओमने ब्राँझ पदक जिंकले.

भारतीय नेमबाजांनी पहिल्या दोन दिवसांत एकूण सात पदकांची कमाई केली. अपूर्वी चंडेलाने ब्राँझ, मेहुली घोषने रौप्यपदक जिंकले. तिकडे वेटलिफ्टिंगमध्ये धडाका कायम राखताना प्रदीप सिंहने १०५ किलो वजनी गटात रौप्यपदकाची कमाई केली. भारताच्या टेबल टेनिस संघानेही राष्ट्रकुल क्रीडा स्पर्धेतील पदकांचा दुष्काळ संपवला. या संघाने बारा वर्षानंतर या स्पर्धेत सांघिक गटात सुवर्णपदक जिंकताना नायजेरियावर मात केली.

पिस्तुल प्रकारात रौप्य पदकावर समाधान मानावे लागलेल्या हिना सिद्धूने रायफल प्रोन प्रकारात मात्र वर्चस्व राखताना सुवर्णपदकाची कमाई केली. या प्रकारात सर्वाधिक आशा असलेल्या चैन सिंग आणि गगन नारंग यांनी मात्र घोर निराशा केली. एकीकडे महिला क्रीडापटू वर्चस्व गाजवत असताना पुरुष खेळाडूंचे अपयश जास्तच अधोरेखित होत होते. समाधानाची बाब म्हणजे प्रमुख खेळाडू अपयशी ठरत असताना पॉवर लिफ्टिंगमध्ये पॅरा पॉवरलिफ्टर सचिन चौधरीने ऐतिहासिक कामगिरी करताना ब्राँझ पदक मिळवले.

भारताच्या श्रेयसी सिंग हिने नेमबाजीत डबल ट्रॅपमध्ये सुवर्ण पदकाचा वेध घेतला व जाणकारांना अचंबित केले. याच गटात पुरुष विभागात अंदुर मित्तलने ब्राँझ पदक पटाकवले. नेमबाजीतच भारताच्या तेजस्विनी सावंतने रौप्य पदकाची कमाई करत देशाने या क्रीडा प्रकारातील वर्चस्व कायम राखले.

कुस्तीमध्ये भारताने चार पदके पटकावत चौकार मारला. मराठमोळा कुस्तीगीर राहुल आवारे याने ५७ किलो फ्री स्टाईल गटात सुवर्णपदक पटकावले. या स्पर्धेच्या सुरुवातीलाच कुस्तीमध्ये आवारेकडूनच पदकाची आशा केली जात होती आणि त्याने ती पूर्ण केली. सुशील कुमारने राष्ट्रकुल स्पर्धेतील सलग तिसरे सुवर्ण पदक पटकावताना ऐतिहासिक कामगिरी केली. महिला गटात बबिता फोगटने ५३ किलो गटात रौप्य तर किरणने ७६ किलो वजनी गटात ब्राँझपदक मिळवले.

मैदानी स्पर्धेत पदकांचा श्रीगणेशा करताना थाळीफेकीत सीमा पुनियाने रौप्यपदकाला गवसणी घातली. याच गटात नवज्योत ढिल्लोनने ब्राँझ पदकाची कमाई केली. सीमा पुनियाचे राष्ट्रकुल स्पर्धेच्या इतिहासातील हे चौथे पदक ठरले. तिने २०१४ च्या आशियाई स्पर्धे त सुवर्ण पदक पटकावले होते, यंदा मात्र तिला रौप्य पदकावर समाधान मानावे लागले.

महाराष्ट्राच्या तेजस्विनी सावंतने नेमबाजीतील यश कायम राखत पन्नास मीटर रायफल थ्री पोझिशन प्रकारात सुवर्णवेध घेतला. याच प्रकारात अंजुम मुद्‌गीलने रौप्यपदक मिळवले. केवळ पंधरा वर्षीय अनीष भानवालने याच प्रकारात पुरुष गटात सुवर्णपदकाची कमाई करत सर्वांनाच आश्चर्याचा धक्का दिला.

टेबल-टेनिसमध्ये महिला दुहेरीत मात्र मौमा दास आणि मानीका बत्रा यांना रौप्य पदकावर समाधान मानावे लागले. कुस्तीमध्ये भारताच्या बजरंग पुनियाने ६५ किलो गटात सुवर्ण पदक पटकावत वर्चस्व राखले. त्याचबरोबर पुजा धांडा आणि मौसम खत्री यांनी रौप्य पदकाची कमाई केली तर दिव्या माकरन हिने ब्राँझ पदक मिळवले. मुष्टीयुध्दातही भारताने पदकांचा धडाका कायम राखला. नमन तन्वरने हेवीवेट गटात ब्राँझपदक, मनोज कुमारने वेल्टरवेट गटात ब्राँझ पदक तर मोहम्मद इसामुद्दीनने ५६ किलो वजनी गटात ब्राँझ पदक पटकावले.



## सुपर मॉम मेरी कोमचे यश

भारताची अव्वल मुष्टीयुद्ध खेळाडू व 'सुपर मॉम' मेरी कोम हिने पुन्हा एकदा आपल्या कामगिरीने स्पर्धा गाजवली. तीन मुलांची आई असलेली मेरी कोम हिची कारकीर्द संपली अशा चर्चा स्पर्धेपूर्वी सुरू होत्या, त्या तिने एका क्षणात संपवल्या. टीकाकार मंडळींना केवळ चोख उत्तरच दिले नाही तर त्यांचेच दात त्यांच्याच घशात घातले. पाच वेळची जगज्जेती आणि ऑलिंपिक पदक विजेती मेरी कोम या स्पर्धे त यशस्वी होण्यासाठीच केवळ सहभागी झाली नव्हती तर अजूनही आपले लक्ष्य 'टोकियो २०२०' आहे हेच सिद्ध करायला सज्ज झाली होती. यावेळी ती प्रथमच राष्ट्रकुल स्पर्धेत सहभागी झाली होती. तिने अंतिम फेरीत उत्तर आयर्लंडच्या क्रिस्टीना ओहाटावर ५-० अशी मात

करत सुवर्णपदक जिंकले. मेरीबरोबरच पुरुष गटात गौरव सोलंकी आणि विकास कृष्ण यांनीही सुवर्ण पदकाची कमाई केली.

नेमबाजीत संजीव राजपूतने पन्नास मीटर रायफल थ्री पोझिशनमध्ये तर नीरज चोप्राने भालाफेकीत देशाला सुवर्णपदक जिंकून दिले. कुस्ती प्रकारात सुमीतने १२५ किलो गटात तर विनेश फोगटने महिला गटात पन्नास किलो गटात सुवर्ण जिंकले.

## मानिका बात्राचे ऐतिहासिक यश



राष्ट्रकुल क्रीडा स्पर्धेत टेबल टेनिसमध्ये मानिका बात्राने ऐतिहासिक कामगिरी केली. या स्पर्धेच्या अंतिम फेरीत तिने सिंगापूरच्या मेंगई यू हिच्यावर ११-७, ११-६, ११-२, ११-७ अशी मात केली. एकेरीचे सुवर्णपदक पटकावणारी मनीषा बात्रा भारताची पहिलीच महिला खेळाडू ठरली. यंदाच्या स्पर्धेतील तिचे हे तिसरे पदक ठरले. एकेरी, सांघिक आणि महिला दुहेरी अशा तीन प्रकारात तिने पदक मिळवले. कुस्तीत विनेश फोगट आणि सुमीत मलीक यांनी सुवर्ण पदके पटकावली तर ऑलिंपीक पदक विजेती साक्षी मलीक हिने आणि सोमवीर यांनी अनुक्रमे महिला आणि पुरूष गटात ब्राँझ पदकांची कमाई केली.

## हॉकी संघांनी आत्मपरीक्षण करावे


सलग तिसऱ्या राष्ट्रकुल क्रीडा स्पर्धेत भारताचा महिला हॉकी संघ पदकाविना परतणार आहे. केवळ महिला संघच नव्हे तर यंदा पुरुष संघालाही अपयशाचा सामना करावा लागला आहे. ऑलिंपिक पदक विजेत्या इंग्लंड संघावर साखळी स्पर्धेत भारताच्या महिलांनी मात केली तेव्हा पदकाची आशा निर्माण झाली होती मात्र त्यानंतर महिला संघाची कामगिरी खूपच खालावली. अगदी ब्राँझपदकाच्या सामन्यात इंग्लंडने भारताचा ६-० असा साफ धुव्वा उडवला. २००६ च्या राष्ट्रकुल स्पर्धेत महिला संघाने पदक मिळवले होते त्यानंतर आजवर एकदाही महिला संघाला पदक पटकावता आलेले नाही. पुरुष गटातही भारतीय संघाला इंग्लंडकडूनच पराभवाचा सामना करावा लागला आणि ब्राँझ पदकाच्या आशाही मावळल्या. राष्ट्रकुल क्रीडा स्पर्धा ही खरेतर 'आशियाई' आणि 'टोकियो ऑलिम्पिक २०२०' या स्पर्धेची रंगीत तालीम ठरणार होती, पण भारताच्या दोन्ही संघांची कामगिरी पाहून असे वाटतच नव्हते की त्यांच्या खेळात काही गांभीर्य आहे. केवळ परदेशी प्रशिक्षक नेमला म्हणजे खेळ उंचावेल हा समज या स्पर्धेने दूर केला हे एक बरे झाले. भारतात आधुनिक ध्यानचंद धनराज पिल्ले असताना इतर कोणाला प्रशिक्षक का नेमतात आणि मग काय हाते हे या स्पर्धेने दाखवून दिले.

## सायनाला सुवर्ण, सिंधू आणि श्रीकांतला रौप्य




फुलराणी सायना नेहवालने महिलांच्या बॅडमिंटन स्पर्धेतील एकेरीच्या अंतिम सामन्यात आपलीच देशभगिनी व ऑलिंपिक रौप्य पदक विजेती खेळाडू पी. व्ही. सिंधू हिचा पराभव केला आणि सुवर्णपदक जिंकले. सायनाने हा सामना २१-१८, २३-२१ असा सरळ जिंकला. पुरुष एकेरीच्या अंतिम सामन्यात अव्वल मानांकित खेळाडू किदाम्बी श्रीकांतला मात्र सूर हरवल्याने रौप्यपदकावरच समाधान मानावे लागले. राष्ट्रकुल स्पर्धेतील इतिहासातील त्याचे हे पहिलेच पदक ठरले. पुरुष दुहेरीत सात्वीक साईराज रंकीरेड्डी आणि चिराग शेट्टी या जोडीने देखील सरस कामगिरी करत रौप्यपदकाची कमाई केली.

स्पर्धेच्या अखेरच्या दिवशी भारताने स्क्वॅश आणि टेबल टेनिसमध्येही पदकांची कमाई केली. दीपिका पल्लीकल आणि जोत्स्ना चिनाप्पा या जोडीने स्क्वॅशमध्ये रौप्य पदक जिंकले. टेबल टेनिसमध्ये अव्वल खेळाडू अचंता शरथ कमालने ब्राँझ पदक पटकावले तर मिश्र दुहेरीत मनीषा बात्रा आणि जी. साथीयान जोडीनेही ब्राँझ पदकांची कमाई केली. भारताने या स्पर्धेत २६ सुवर्ण, २० रौप्य आणि २० ब्राँझ अशी एकूण ६६ पदके मिळवत पदक तालिकेत तिसरे स्थान राखले. आता भारतीय खेळाडूंनी आशियाई आणि 'टोकियो २०२०'ची रंगीत तालीम चांगलीच यशस्वी केली. आशियाई स्पर्धा येत्या सप्टेंबरमध्ये होणार असून राष्ट्रकुलचा कित्ता तिथेही गिरवला तर खऱ्या अर्थाने भारतीय खेळाडू ऑलिंपिकला सज्ज होतील.



या पदक विजेत्या खेळाडूंच्या कामगिरीची दखल भारतातील सर्व राज्य सरकारांनी घेतली व रोख रकमेच्या पुरस्कारांची घोषणाही केली आहे. त्यामुळे आता खेळाडू केवळ पदक विजेते न राहता लक्षाधीशही बनणार आहेत. आता खरी कसोटी आशियाई स्पर्धा आहे आणि त्यातही अशीच कामगिरी भारतीय खेळाडू करतील अशी अपेक्षा आहे.

# महाराष्ट्र राज्य महिला आयोगाच्या प्रयत्नाने ओमान येथे अडकलेल्या महिलेची सुटका

## आयोगाच्या 'सुहिता' हेल्पलाईनवर आलेल्या तक्रारीवरून महिलेला न्याय मिळवून देण्यात यश

साद प्रतिनिधी

महाराष्ट्र राज्य महिला आयोगाच्या प्रयत्नाने आणि परराष्ट्र मंत्रालयाच्या मदतीने मस्कत, ओमान येथे अडकलेल्या फरीदा खान या महिलेची सुटका झाली आहे. या महिलेने आज पती सह आयोगाच्या अध्यक्षा विजया रहाटकर यांची भेट घेऊन आभार मानले.

अंबरनाथ येथे राहणारया फरीदा खान नोकरीसाठी एजंटमार्फत दुबईला गेल्या मात्र त्यांनतर त्यांचा संपर्कच तुटल्याने त्यांचे पती अब्दुल अजीज खान यांनी महिला आयोगाच्या 'सुहिता' (७४७७७२२४२४) या हेल्पलाईनवर फोन करून आपली व्यथा सांगितली. प्रकरणाचे गांभीर्य लक्षात घेऊन अब्दुल अजीज खान यांना ०६/०४/२०१८ रोजी आयोग कार्यालयात बोलविण्यात आले. त्यांनी दिलेल्या माहितीप्रमाणे फरीदा या घरातील अडचणीच्या आर्थिक परिस्थितीमुळे २७ जानेवारी २०१८ रोजी दुबई येथे नोकरीसाठी गेल्या मात्र त्यानंतर त्यांना मस्कत येथे पाठविण्यात आले आणि त्यांचा कुटुंबियांशी संपर्क तुटला. त्यांना जिथे कामासाठी पाठविण्यात आले तिथे त्यांचा छळ होत होता. मात्र पासपोर्ट व इतर कागदपत्र जप्त केल्याने त्यांचे परतीचे मार्ग ही बंद झाले होते. पती अब्दुल अजीज खान यांनी आयोगाला दिलेल्या माहितीच्या आधारे आयोगाच्या अध्यक्षा विजया रहाटकर यांनी परराष्ट्र मंत्री सुषमा स्वराज यांच्याशी याबाबत चर्चा करून मदत करण्याची विनंती केली. सुषमा स्वराज यांनी स्वतः ओमान येथील भारतीय दूतावासाला याबाबत लक्ष घालण्याचे आदेश दिले. दूतावासाने ओमान येथील एजंटकडे याबाबत चौकशी सुरु झाल्यानंतर फरीदा खान यांना परत पाठविण्याचा निर्णय झाला आणि १ मे च्या रात्री फरीदा खान याना मुंबईकडे रवाना करण्यात आले.

परत आल्यानंतर औषधचार घेत असलेल्या फरीदा खान यांनी आज विजया रहाटकर यांची भेट घेऊन त्यांचे आभार मानले. तसेच अनेक महिला नोकरीसाठी दुबई, मस्कत येथे जातात मात्र त्यांना गुलामासारखी वागणूक दिली जाते तेव्हा यातून आपल्या



सारख्या इतर महिलांना सोडवावे अशी विनंती ही त्यांनी यावेळी केली. याबाबत बोलताना विजया रहाटकर म्हणाल्या कि, 'सुहिता' (७४७७७२२४२४) या नव्यानेच आयोगाने सुरु केलेल्या हेल्पलाइनवर ही तक्रार आली होती. याचे गांभीर्य लक्षात घेऊन आयोगाने परराष्ट्र मंत्रालयाच्या मार्फत सर्वतोपरी मदत केली आणि आज फरीदा परत आपल्या २ मुली आणि पतीसोबत आहेत. भविष्यात अशा घटनांचा महिलांना सामना करावा लागू नये यासाठी आयोग परराष्ट्र मंत्रालयासोबत काम करणार आहे. तसेच महिलांची फसवणूक करणाऱ्या एजंट विरोधात ही कारवाई व्हावी यासाठी पोलिसांना सूचना देण्यात येतील.

# अन्याय सहन करू नका, कायद्याची मदत घ्या



- महिला आयोग सदैव आपल्या पाठीशी आहे.
- कामाच्या ठिकाणी महिलांचा होणारा लैंगिक छळापासून प्रतिबंध/ मनाई/ निवारण कायदा, २०१३ नुसार कामाच्या ठिकाणी महिलांना सुरक्षितता आहे.
- कौटुंबिक हिंसाचार कायदा,२००५ अन्वये महिलांना संरक्षण, निवारा, मुलांचा हक्क/ नुकसान भरपाई/पोटगी या कायद्यान्वये मागू शकतात.
- गर्भधारणापूव व प्रसूतीपूर्व निदान तंत्र अधिनियम १९९४ या कायद्याने लिंग निवडीबाबत प्रतिबंध करण्यात आला आहे.
- सायबर क्राईम अधिनियम २०१५ अन्वये अश्लील मजकूर इलेक्ट्रॉनिक स्वरूपात प्रसिद्ध करणे, महिती काढणे कायद्याने गुन्हा आहे.
- अनैतिक व्यापार प्रतिबंधक कायदा, १९५६ अन्वये महिलांची तस्करी करणे कायद्याने गुन्हा आहे.
- लैंगिक गुन्ह्यांपासून बालकांचे संरक्षण कायदा २०१२ (**POCSO**) अन्वये अल्पवयीन बालकांवरील अत्याचारास प्रतिबंध करण्यात आला आहे.

## साद-प्रतिसाद

प्रिय वाचक,
साद अंकाविषयी आपल्या प्रतिक्रियांची आम्ही वाट पाहत आहोत. त्याच बरोबर आपल्या समस्यांविषयी मार्गदर्शन हवे असल्यास आपण ‘साद’शी संपर्क साधू शकता. आपल्या समस्या खालील मेलवर लिहून पाठवा.
saad.mscw@gmail.com

रौप्य महोत्सवी वर्ष २०१८

// स्त्रीशक्तिरतुल्या सदा //

**महाराष्ट्र राज्य महिला आयोग, मुंबई**
गृहनिर्माण भवन म्हाडा बिल्डिंग,
कलानगर, वांद्रे (पू.), मुंबई ४०००५१
दूरध्वनी : ०२२ – २६५९०८७८
mscwmahilaayog@gmail.com

# आयोगाची घटना, अधिकार व कर्तव्ये

भारताच्या राज्य घटनेचे कलम १४,१५ व १६ अन्वये स्त्रियांच्या संबंधात हमी देण्यात आलेले मूलभूत हक्क मिळवून देण्यास चालना देण्याच्या उद्देशाने आणि स्त्रियांचा समाजातील दर्जा व प्रतिष्ठा सुधारण्याकरिता, विशेषतः राज्य घटनेच्या कलम ३८,३९, ३९–ब, ४२–ब मध्ये अंतर्भूत केलेली राज्याच्या धोरणाची निर्देशक तत्त्वे अमलात आणण्यासाठी, स्त्रियांची अप्रतिष्ठा करणाऱ्या प्रथांच्या बाबतीत अन्वेषण करून योग्य त्या सुधारणात्मक उपाययोजना करण्यासाठी किंवा सुचविण्यासाठी, स्त्रियांवर परिणाम करणाऱ्या कायद्याचे परिणामकारकरित्या संनियंत्रण व अंमलबजावणी करण्यासाठी व स्त्रियांचा समाजातील दर्जा व प्रतिष्ठा सुधारणे वा उंचावणे या गोष्टींशी संबंधित असलेल्या सर्व बाबींवर शासनाला सल्ला देण्यासाठी व त्याच्याशी संबंधित किंवा तद्नुषंगिक बाबींसाठी राष्ट्रीय महिला आयोगाच्या धर्तीवर महाराष्ट्र राज्यात महाराष्ट्र राज्य महिला आयोगाची स्थापना १९९३ साली करण्यात आली.

## आयोगाची प्रमुख उद्दिष्ट्ये

- समाजात महिलांचे स्थान आणि प्रतिष्ठा उंचावणे
- महिलांबाबत होत असलेला अन्याय शोधून काढणे आणि तो दूर करण्यासाठी उपाय सुचविणे
- राज्य घटना व अन्य कायदे या नुसार महिलांसाठी तरतूद करण्यात आलेल्या संरक्षक उपाययोजनांसंबंधीच्या सर्व बाबींचे अन्वेषण व तपासणी करणे
- त्या संरक्षण उपाययोजनांच्या अंमलबजावणीसंबंधीचे अहवाल दरसाल किंवा आयोगास योग्य वाटेल अशा अन्य वेळी राज्य शासनास सादर करणे
- स्त्रियांची स्थिती सुधारण्यासाठी राज्याला त्या संरक्षक उपाययोजनांची अधिक परिणामकारकपणे अंमलबजावणी करता यावी, यासाठी अशा अहवालांमध्ये शिफारशी करणे
- संविधान व इतर कायदे यांच्या, स्त्रियांना बाधक होणाऱ्या विद्यमान तरतुदींचा वेळोवळी आढावा घेणे आणि अशा कायद्यांमधील कोणत्याही उणिवा, अपूर्णता किंवा दोष दूर करण्यासाठी त्या कायद्यांमध्ये सुधारात्मक वैधानिक उपाययोजनांबाबतच्या सुधारणांची शिफारस करणे
- समाजात महिलांचे स्थान आणि प्रतिष्ठा उंचावण्यासाठी राज्य सरकारला योग्य सल्ला देणे

## आयोगाचे अधिकार

- महाराष्ट्र राज्य महिला आयोग ही वैधानिक संस्था आहे
- आयोगाला खटल्याची न्यायचौकशी करणाऱ्या दिवाणी न्यायालयाचे सर्व अधिकार असतील
- राज्याच्या कोणत्याही भागातील कोणत्याही व्यक्तीस हजर राहण्यासाठी फर्मावणे व हजर राहण्यास भाग पाडणे आणि शपथेवर तिची तपासणी करणे
- कोणतेही दस्तऐवज शोधून काढण्यास व ते सादर करण्यास फर्मावणे
- शपथपत्रावरील साक्षी, पुरावे स्वीकारणे
- कोणत्याही न्यायालयाकडून किंवा कार्यालयातून कोणताही सार्वजनिक अभिलेख किंवा त्याची प्रत मागवणे
- साक्षीदारांच्या किंवा दस्तऐवजांच्या तपासणीसाठी राजादेश काढणे
- महिलांशी संबंधित प्रकरणांमध्ये एखादा राज्य सरकारी वा केंद्र सरकारी अधिकाऱ्याची चौकशी अधिकारी म्हणून नियुक्ती करण्याचाही अधिकार आयोगाला आहे.

## आयोगाचे उपक्रम

- महिलांना मोफत कायदेविषयक सेवा पुरविणे
- महिलांच्या प्रश्नांबाबत संशोधन करणे
- महिलांविषयक बाबींवर कार्यशाळा, शिबिर आणि प्रशिक्षण आयोजित करणे
- समाजात लिंगसमानता प्रस्थापित करण्यासाठी विशेष प्रयत्न करणे
- सर्व संबंधित घटकांसाठी जनजागृती मोहीम राबविणे
- कायदेविषयक साक्षरता मोहीम राबविणे
- स्वयंसेवी संस्थांच्या सहकार्याने उपक्रम राबविणे
- राज्यातील कारागृहांची तपासणी करणे
- बालसुधारगृहे आणि महिलांसाठीच्या संस्थांची तपासणी करणे
- महिलांसाठी विविध शिबिरे आयोजित करणे
- समुपदेशन सुविधा उपलब्ध करून देणे
- आयोगासमोर सुनावणी घेणे
- जनसुनावणी घेणे
- सरकारला महिलांविषयक धोरणांसाठी शिफारशी करणे



रौप्य महोत्सवी
वर्ष २०१८

// स्त्रीशक्तिरतुल्या सदा //

# महाराष्ट्र राज्य महिला आयोग, मुंबई


गृहनिर्माण भवन म्हाडा बिल्डिंग,
कलानगर, वांद्रे (पू.), मुंबई ४०००५१
दूरध्वनी : ०२२ – २६५९०८७८

mscwmahilaayog@gmail.com
www.mscw.org.in
Maharashtra Rajya Mahila Ayog (@mahascw)
Maharashtra women commission (@mscw_bandra)
Tejaswini App

chairperson.mscw@gmai.com
www.vijayarahatkar.co.in
@vijaya.rahatkar
@VijayaRahatkar
vijayarahatkar.wordpress.com